मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ७१ ❖ संपादिका: डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ❖ सप्टेंबर २००७

वेबसाईट : www.marathepratishthan.org ई-मेल: maratheparivar@yahoo.co.in

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.) (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय भूमिका

प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार .

ध्वजा उंच जा हिमालयावर।
अवघे सागर जेथुनि दिसतिल।
जाउनी तेथे सांग जगाला।
भारत माझा स्वतंत्र झाला।।

१५ ऑगष्ट २००७ ला आपण स्वातंत्र्याचा हीरक महोत्सव साजरा केला. पांच तपे म्हणजे साठ वर्षे स्वातंत्र्य मिळून झाली. व्यक्तीच्या आयुष्यात साठाव्या वर्षी साधारणपणे निवृत्ती स्वीकारली जाते. परंतु राष्ट्राच्या बाबतीत साठ वर्षाचा काळ हा तसा बाल्यावस्थेचा असतो. जगामध्ये आपलं स्थान शोधायला आणि आणि आपल्या पायावर उभं राहायला एवढा काळ लागतो. तरीही या कालावधीत आपण ज्ञान विज्ञानाच्या बाबतीत उत्तुंग क्षेत्रे पादाक्रान्त केलेली आहेत. अगदी अंतराळातही सुनीता विल्यम्सने भारताचे नांव उज्ज्वल केले आहे. जगातील पहिली महिला सर्वोच्चपदी विराजमान झाली ती भारतातच! जग आता भारताकडे बघतंय. भारत जगाकडे नाही. हा आत्म विश्वासपूर्ण बदल निश्चितच अभिमानास्पद आहे.

त्याचबरोबर ज्या क्रांतिकारकांनी बलिदान केले, भारतमाता परदास्यातून मुक्त होण्यासाठी आले रक्त सांडले, जे हुतात्मा झाले, ज्यांच्या अतुलनीय शौर्यामुळे व त्यागामुळे आपण आज स्वतंत्र होऊन सुखात जगत आहोत त्या सर्व देशभक्ताना वंदन करणे आपले आद्य कर्तव्य ठरते. भारत स्वतंत्र झाला तरी देशाची फाळणी झाली हे दु:ख आपण विसरू शकत नाही. भारताच्या इतिहासातील अत्यंत दारुण नि दुर्भाग्यपूर्ण घटना म्हणजे देशाची फाळणी देशावर लादली गेली. अखंड भारताचे पाहिलेले स्वप्न कधी पूर्ण होणार? कि होणारच नाही. आज ज्या पद्धतीचे राजकारण देशावर अंमल करीत आहे त्यावरून तर अखंड भारत हे स्वप्न

*(पुढील मजकूर पृ.११ वर)*



अनुराधा वसंत खोत लिखित

श्री. विक्रम सावरकर यांच्या संघर्षमय जीवनाचा प्रेरणादायी आलेख!

## 'युद्ध आमचे सुरू'

**-शूर महापुरुषाची समरगाथा अर्थात्**

**-देशभक्तीच्या रसाने लेखणी धन्य झाली!**

**समीक्षिका-डॉ. सौ. सुमेधा प्र.मराठे (पृ.१२०)वडाळा-प. मुंबई F २४१५०८८९**

### ग्रंथाचे सार्थ नांव

मंगळवार दि.१३मार्च २००७ला सायंकाळी दादरच्या स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या विशाल प्रांगणात, 'युद्ध आमचे सुरु' या महान ग्रंथाचा भव्य प्रकाशन समारंभ हिंदुत्त्वनिष्ठ नटश्रेष्ठ श्री. प्रभाकरपंत पणशीकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. ग्रंथाचे प्रकाशन मुंबई विद्यापीठाच्या भूतपूर्व कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या शुभहस्ते झाले. नागपूरचे विख्यात अष्टपैलू साहित्यिक आणि मार्क्सवादी विचारवंत आचार्य वि.स.जोग यांचे प्रमुख वक्ते म्हणून 'युद्ध आमुचे सुरू'या ग्रंथाची उत्कृष्ट समीक्षा करणारे भाषण ऐकल्यावर ग्रंथ वाचण्याची उत्कंठा श्रोत्यांच्या मनात निर्माण झाल्याचे जाणवले. सुमारे ५०० जाणकार श्रोत्यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या समारंभानंतर तेथेच शंभर ग्रंथांची खरेदी झाल्याचे समजले.

या ग्रंथाची समीक्षा करण्यासाठी मी वाचन केल्यावर मला प्रकर्षाने जाणवले ते ग्रंथाचे यथार्थ नांव. कारण चरित्रनायक श्री. विक्रम सावरकर यांनी स्वातंत्र्यवीर यांचे 'कृतिशील अनुयायी' म्हणून गेल्या साठ वर्षात देशहिता साठी केलेले संघर्ष अजूनही संपलेले नाहीत!

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भारताचे झालेलेविभाजन नष्ट करून "स्वतंत्र, सार्वभौम, बलसंपन्न, अखंड हिंदुस्थान" निर्माण करण्याचे दायित्व पुढील युवा पिढीवर सोपविले. त्यांनी दिलेली "एक धक्का और दो, पाकिस्तान तोड दो" ही फाळणीनंतर दिलेली घोषणा, वेगळ्या अर्थाने का होईना १९७१ च्या युद्धात भारताच्या लढाऊ प्रधानमंत्री इंदिराजी गांधी यांनी पाकिस्तानचे दोन तुकडे करून-बांगला देशाची निर्मिती करून- प्रत्यक्षात साकारली! परंतु देशाची अखंड भारताकडे वेगाने वाटचाल सुरू होण्याऐवजी उर्वरित पाकिस्तान आणि बांगला देश यातून भारतात सातत्याने घुसखोरी करून सशस्त्र मुस्लिम दहशतवादी भारताचे आणखी

*(पुढील मजकूर पृ. १० वर)*

❖ संपादकीय सहाय्य व अक्षरजुळणी : सीताराम गोपाळ खांबेटे (पृ.६७६) ❖


(१)संपादिका:डॉ.सौ.सुमेधा प्र मराठे ८/१३, सहकार नगर, वडाळा-प. मुंबई ४०००३१; दूरध्वनी २४१५०८८९ ; ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com


(२)सहायक संपादक:श्री.सीताराम गो.खांबेटे ए-१३, संपदा सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी-पूर्व, मुंबई ४०००६९.

F : २६८३६९९४; सेल-९८३३५६४२६८; ई-मेल : (1)sitaram_khambete@yahoo.com (2) maratheparivar@yahoo.co.in


१. 'किरात'कार श्रीधर केशव मराठे यांना पु.भा. भावे स्मृती पत्रकारिता पुरस्कार देऊन श्री. शं.ना. नवरे यांचे हस्ते डोंबिवली येथे सत्कार.
२.'प्रकाशझोता'तले अभय मराठे यांचा रक्तदान दिवशी उज्जैनचे कलेक्टर श्री. मंडलोई यांचेकडून सत्कार.(पृ. २२ वर)
३.'युद्ध आमुचे सुरू'या चरित्रग्रंथाचे मुखपृष्ठ. पुस्तक-परीक्षण लेख मागे मुखपृष्ठावर.






## मंगलमूर्ती मोरया





# प्रतिष्ठान वृत्त

## कार्यकारी मंडळ

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करावा म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

मागील जून ते ऑगष्ट २००७ या तिमाहीत दि. ९-०६-०७, १४-०७-०७, २२-७-०७ व ११-८-०७ या दिवशी कार्यकारी मंडळाच्या बैठका झाल्या.

१. दि.९-०६-०७ ला प्रतिष्ठान कार्यालयात भरलेल्या बैठकीमध्ये २२-७-०७ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याचे निश्चित करण्यात आले.

२. दि.१४-०७-०७ ला प्रतिष्ठानच्या कार्यालयात भरलेल्या बैठकीमध्ये ५ सदस्य उपस्थित होते.

३. दि.२२-०७-०७ च्या श्री रमाकांत विद्वांस यांच्या निवासस्थानी भरलेल्या बैठकीत ६ सदस्य उपस्थित होते.

४. दि.११-८-०७ ला प्रतिष्ठान कार्यालयात भरलेल्या सभेमध्ये अध्यक्षस्थानी श्री. आनंदराव होते. माजी कार्यकारिणी सदस्य श्री.सुरेंद्रनाथ यांच्या पत्रावर चर्चा करण्यात आली. त्यानंतर श्री भाऊ मराठे यांच्याशी अध्यक्षांनी फोनवर संपर्क साधला व १३ ऑक्टोबरचा त्यांचा ठाणे येथील कार्यक्रम निश्चित करण्यात आला. (सविस्तर माहिती या अंकात अन्यत्र आहे.)

या शिवाय दोन अनौपचारिक बैठका झाल्या

यापैकी दिनांक १४- ८-२००७ रोजी श्री. भाऊ मराठे यांचे दादरच्या निवासस्थानी अध्यक्ष श्री आनंदराव, ल.शं., व्ही.के. व सी.गो खांबेटे यांनी भाऊ मराठे यांस मराठे कलामंचच्या संयोजकत्वाची जबाबदारी स्वीकारण्याची विनंति केली ती त्यांनी उत्स्फूर्तपणे स्वीकारली. इतकेच नव्हे तर आपण होऊन त्यांचे दोन लोकप्रिय कार्यक्रम (भाऊचा धक्का) प्रतिष्ठानच्या मुंबई व पुणे शाखेसाठी देण्याचे घोषित केले. यापैकी १३-१०-२००७ ला ठाणे येथे व २५-१२-२००७ रोजी पुणे येथे हे 'धक्के' अनुभवायला मिळतील. त्याचा तपशील अन्यत्र आला आहे.

दुसरी अनौपचारिक सभा श्री रमाकांत विद्वांस यांच्या खंडाळा येथील बंगल्यावर प्रामुख्याने श्री. भाऊ मराठे यांच्याशी सुसंवाद दृढ करण्याच्या हेतूने घेण्यात आली म्हटले तर वावगे होणार नाही. यावेळी भाऊ, वा.ग, आनंदराव, रमाकांत आणि सी गो यांचा सहभाग होता. आनंदराव व रमाकांत यांनी पाहुणचार व सरबराई चोख ठेवली होती.

-०-

## २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

शनिवार दि. २२-७-२००७ रोजी सायं. ५ वा. प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा दामले योग केंद्र सभागृह, माटुंगा (प.) या ठिकाणी भरली होती. कार्याध्यक्ष श्री. आनंदराव मराठे त्यांच्या नात्यातील श्री.मुकुंद जोशी यांचे निधनामुळे सभेला येऊ शकले नाहीत. सभेचे अध्यक्षस्थानी कार्योपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस विराजमान झाले तसेच प्रतिष्ठानच्या एक विश्वस्त श्रीमती सुलभाताई सुरेश मराठे या आवर्जून उपस्थित होत्या.

ही पंचविसावी म्हणून विशेष महत्त्वाची व कौतुकाची वार्षिक सर्वसाधारण सभा ठीक ५.३० वा. सुरू झाली.

# सभासद वृत्त

## मान सन्मान

### १.'समाजरत्न' नंदकुमार मराठे

२२५७/अ, जिवबानाना जाधव कॉंप्लेक्स
बाबू जमाल तालिमजवळ,कोल्हापुर ४१२०१६;
G०२३१-२५४१८२३

कोल्हापूर येथील सदस्य श्री. सदानंद दिनकर उर्फ नंदकुमार मराठे (पृ.२१९) याना समृद्ध प्रतिष्ठान तर्फे 'समाजरत्न' हा राज्यस्तरीय पुरस्कार, शिक्षण राज्यमंत्री श्री. हसन मुश्रीफ यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. श्री. मराठे यानी सिद्धी विनायक सांस्कृतिक सेवा मंडळ, श्रीमहालक्ष्मी भक्तमंडळ, कोल्हापूर चित्पावन संघ, मंगलधाम कार्यालय, आंतरराष्ट्रीय लायन्स क्लब, अखिल भारतीय कीर्तन कुल, करवीर नगरवाचन मंदिर, इ. संस्थांमार्फत केलेल्या कार्यासाठी त्यांचा हा बहुमान करण्यात आला. या प्रसंगी मयूर दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील, झि.प.चे शिक्षण अधिकारी दिनकर पाटील, उपनिरीक्षक जोशिलकर, उमाजी नाईक समाजसुधारक महाराष्ट्र मंडळाचे वसंतराव चव्हाण इ. मान्यवर उपस्थित होते. तसेच ज्येष्ठ समाजसेविका सिंधूताई सपकाळ यांचे गौरवपर भाषण झाले. -०-



### २. आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेती सौ.नीलिमा पटवर्धन

डहाणूकर कॉलनी,कोथरूड
पुणे ४११०३८;
F०२०-२५४१०७३७.

श्री. श्री.व्यं.मराठे (पृ.४३) यांची कन्या सौ. नीलिमा पटवर्धन या सध्या आाकाशवाणी पुणे केंद्र येथे प्रसारण अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्या एम ए. संस्कृत (पुणे विद्यापीठ) आहेत. त्यांनी संस्कृत विषयाशी संबंधित अनेक कार्यक्रम सादर केले आहेत. उदाहरणार्थ- अथा तो वेद जिज्ञासा, कौटिलीय अर्थशास्त्र, उपनिषदांचे अंतरंग आणि श्रीमद्भगवद्गीता. या कार्यक्रमांना रसिक श्रोत्यांची पसंती मिळाली आहे.

अलिकडेच एशिया पॅसिफिक इन्स्टिट्यूट फॉर ब्रॉडकास्टिंग डेव्हलपमेंट या संस्थेतर्फे देण्यात येणारा सर्वोत्कृष्ट समाजहितपर जाहिरातीचा पहिला पुरस्कार जाहीर झाला आहे.

आशिया खंडातील सव्वीस देशातील शासकीय प्रसारमाध्यमे या स्पर्धेसाठी दर्जेदार कार्यक्रम पाठवितात. नीलिमाने ' स्त्री भ्रूण हत्या' या विषयावर तयार केलेल्या इंग्रजी जाहिरातीला हा पुरस्कार देण्यात आला. श्री दिलीप चित्रे यांनी या जाहिरातीचे संहिता लेखन केले आहे. स्त्री भ्रूण हत्या करणे म्हणजे मानवतेचा विनाश आहे असा या जाहिरातीचा आशय आहे.



### ३. पु.भा.भावे' स्मृती पत्रकारितापुरस्काराचे मानकरी किरातकार श्रीधर मराठे

भटवाडी, वेंगुर्ले ,सिंधुदुर्ग ४१६५१६. F०२३६६- ६२४४५

वेंगुर्ले येथील साप्ताहिक 'किरात' चे संपादक श्री. श्रीधर केशव मराठे (पृ.३९६) याना श्रेष्ठ साहित्यिक, पत्रकार, आणि विचारवंत कै. पु.भा.भावे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारांपैकी पत्रकारिता पुरस्कार प्रदान करुन गौरविण्यात आले.डोंबिवली येथे दि. १२ ऑगष्ट २००७ रोजी संपन्न झालेल्या, रोख एक हजार रुपये व मानपत्र असे स्वरूप असलेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी आमदार श्री अशोक मोडक हे प्रमुख वक्ते होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक श्री.शं.ना.नवरे होते. तसेच प्रतिष्ठानतर्फे श्री. सीताराम खांबेटे हे आवर्जून ऊपस्थित होते. -०-

### ४.अभिषेक विवेक व रसिका या भावंडांचे विदेशगमन

पुण्याचे सदस्य श्री. श्रीकांत माधव मराठे (पृ.२११) यांचे नातू चि. अभिषेक विवेक मराठे यानी मुंबई विद्यापीठाची बी. ई. कंप्यूटर ही पदवी घेऊन M.S. in M I S या दोन वर्षाच्या उच्च शिक्षणासाठी नुकतेच बोस्टन (यू एस ए) येथे प्रयाण केले.

तसेच कु.रसिका मराठे यांनी फर्ग्युसन कॉलेजतर्फे आयोजित तेरा दिवसाच्या शैक्षणिक

(पुढील मजकूर पृ. २३ वर )

# या अंकांत


| क्र. | विषय | लेखक | पृ. |
|---|---|---|---|
| १. | संपादकीय भूमिका | सुमेधा प्र. मराठे | ०१ |
| २. | "यु द्ध आमचे सुरू" (पुस्तक परीक्षण) | सुमेधा प्र. मराठे | ०१ |
| ३. | क्ष-ण-चि-त्रे | | ०२ |
| ४. | प्रतिष्ठान वृत्त | मोहन स. मराठे | ०२ |
| ५. | सभासदवृत्त-मानसन्मान | सुमेधा प्र. मराठे | ०३ |
| ६. | या अंकांत (अनुक्रमणिका) | | ०३ |
| ७. | सावरकरांचे कथाविश्व | सी.गो.खांबेटे | ०४-०५ |
| ८. | आधी वंदूं तुज मोरया ! | वि.के.मराठे | ०६ |
| ९. | माहेरच्या अंगणात-(१) आमची वहिनी-उद्योगी महिला | वृषाली वा. मराठे | ०७ |
| १० | एक बूँद पानीका (कविता) | वा.ग. मराठे | ०७ |
| | English Section | | |
| ११ | Time is money ? | | ०८ |
| १२. | 'Legal' Jokes | | ०८ |
| १३. | Puneri Hindi | | ०८ |
| १४. | मराठे युवा वर्गासाठी आवाहन | हेमंत अरुण मराठे | ०९ |
| १५. | युवा कलाकारांसाठी आवाहन | भाऊ मराठे | ०९ |
| १६. | आम्ही मराठे (कविता) | प्रतिभा सु. मराठे | ०९ |
| १७. | प्रतिष्ठान दैनंदिनी २००८ | नीलांबरी मराठे | ११ |
| १८. | हितगुज वेब पत्रिकेच्या निमित्ताने | सी.गो.खांबेटे | ११ |
| १९. | "बेस्ट" मधील "श्री.ना." | गजानन भा.मराठे | १२ |
| २०. | नवीन उपक्रमांसाठी आवाहन १.हितगुजची हेल्पलाईन २.मराठे परिवार कट्टा | सी.गो.खांबेटे | १२ |
| २१. | माझे संचित- एक कविता | भाऊ मराठे | १३ |
| २२ | आजीव सभासद व हितगुज तहहयात वर्गणीदार अर्ज नमुना | | १३ |
| २३ | सभा-समारंभांना सदस्यांच्या उपस्थितीसाठी आवाहन | हेमंत अरुण मराठे | १३ |
| २४ | तहान (कविता) | अस्मिता वेलणकर | १४ |
| २५ | कै.चिंतामण ब स्मृती प्रित्यर्थ निबंध स्पर्धा २००८ | गजानन चिं. मराठे | १४ |
| २६ | उत्सव स्वातंत्र्याचा | सुनीती ज.मराठे | १५ |
| २७ | कृतज्ञ मी !कृतार्थ मी ! ! | " वा.ग." मराठे | १६ |
| २८ | गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी सूचना | | १७ |
| २९ | संस्कार की सोहळा ? | मंगला प्र. मराठे | १८ |
| ३० | सभासदवृत्त-सहवेदना | | १९ |
| ३१ | सदस्य-संवाद | सी.गो.खांबेटे | २० |
| ३२ | प्रकाशझोत (४):अभय मराठे, | सी.गो.खांबेटे | २२ |
| ३३ | स्मरणार्थ-पूर्वसूचना | | २३ |



# सावरकरांचे कथाविश्व

लेखकः सीताराम गोपाळ खांबेटे (पृ.६७६),अंधेरी-पू.मुंबई दूरध्वनीः २६८३६९९४ सेल-९८३३५६४२६८

विसाव्या शतकाची प्रारंभीची ४० वर्षे मराठी साहित्याच्या इतिहासातील सुवर्णयुग होते. इंग्रजी भाषेच्या प्रभावातून सुटून स्वतंत्रपणे वाङ्मयाभिव्यक्ती करणारे अनेक प्रतिभावान ललित लेखक याच काळात उदयाला आले. या सर्वात एका आगळ्याच व्यक्तिमत्वाच्या वैशिट्यांनी मराठीतील निबंध, चरित्र, आत्मचरित्र, काव्य, नाटक, कथा, कादंबरी, व ऐतिहासिक निबंध या विविध वाङ्मय प्रकाराना समृद्ध करणारा एक तेजस्वी लेखक म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर होते. 'सावरकरांचे कथालेखन' या तुलनेने अल्पज्ञात विषयावर प्रस्तुत लेखात प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

सावरकरांच्या कथालेखनाचा विचार त्यांचे व्यक्तिमत्त्व व या कथांचे कलाविषयक निकष या दोन दृष्टीने करावा लागतो. सावरकरांचे व्यक्तिमत्त्व हे बहुमिती आहे. परस्परविरोधी आणि समन्वय न घडलेल्या अनेक प्रवृत्ती त्यांचे ठायी होत्या. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात प्रज्ञा व प्रतिभा यांचा अपूर्व संगम होता. त्यांच्या ठिकाणच्या प्रज्ञेने त्यांना प्रखर बुद्धिवादी, तर्कशील ज्ञानपिपासू, विचारप्रवण व टीकाकार बनविले. त्यांची विज्ञानदृष्टी, हिंदुत्वाभिमान व स्वातंत्र्यनिष्ठा ही त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेचीच अपत्ये होत. करारी व धाडसी वृत्ती,स्वातंत्र्याचा अखंड ध्यास, हौतात्म्याचे आकर्षण, आशावाद व अखंड परिश्रम हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे गुणविशेष होते. ज्वलंत राष्ट्रनिष्ठा, काळाच्या पुढे झेपावणारे दृष्टेपण, व मानवतावाद हे त्यांच्या जीवनाचा अविभाज्य अंग होते. सावरकर नेहमी म्हणत , "आमची खरी जात मनुष्य, खरा धर्म माणुसकी, खरा देश पृथ्वी व खरा राजा ईश्वर." यावरून व्यक्तिपेक्षा राष्ट्रहित, राष्ट्रहितापेक्षा मानवहित त्याना श्रेष्ठ वाटत होते हे दिसते. राष्ट्राचा विचार करताना ते हिंदुराष्ट्र या कल्पनेचा पुरस्कार करतात. हिंदुधर्माचे अभिमानी असूनही सावरकरानी धर्मातल्या अनेक कालबाह्य, बुद्धीला न पटणाऱ्या वेडगळ समजुती, चालीरिती यांवर प्रखर विज्ञानदृष्टीचे व मानवहिताचे निकष लावून कडाडून टीका केली. त्यांनी ज्या मोजक्याच २०-२२ कथा लिहिल्या त्या सर्व समाजसुधारणेच्या एकमेव उद्देशाने प्रेरित होत्या.

सावरकरांच्या या व्यक्तिमत्त्व दर्शनातून प्रतीत झालेल्या ध्येयवादाच्या पृष्ठभूमीवर त्यांचे कथाविश्व अभ्यासले म्हणजे साहित्यिक टीकाकारांचे काटेकोर निकष दुय्यम ठरतात. त्यामुळेच त्यांच्या कथा या त्यांच्या समकालीन फडके, खांडेकर, य.गो. जोशी, व वामनराव चोरघडे यांसारख्या कथेचे कलात्मक सौंदर्य वाढविणाऱ्या प्रतिभावंत कथाकारांच्या तुलनेने कमअस्सल वाटतीलही. कारण त्यांची प्रकृतीच भिन्न होती. सावरकरांनी आपल्या साऱ्याच कथांची निवड स्वतःच्या अंगीकृत कार्यातून व जीवनाकडे बघण्याच्या तत्त्वज्ञानातून केली. आयुष्यात ज्या अनेक चळवळी व कार्ये केली त्यातून वेचलेले अनुभवच त्यांनी कथेतून शब्दबद्ध केले. स्त्रियांचे प्रश्न, अस्पृश्यांचा उद्धार, अनाथालये, जुन्या टाकाऊ झालेल्या रूढी व उत्सव, जातिभेद, रोटी-बेटी व्यवहार असे विविध विचार त्यांचे कथाविषय आहेत.

आता त्यांच्या कथांचे काही मासले पाहूया. सावरकरांच्या गोष्टी भाग-१ मध्ये १२ गोष्टी व अन्य १० कथा 'समाजचित्रे' म्हणून सावरकरांच्या गोष्टी भाग-२ मध्ये प्रकाशित झाल्या आहेत.

**कुसूम** या कथेतून त्यानी पुनर्विवाहाचा प्रश्न मांडला. वडगांवच्या बक्षीस समारंभाचे वर्णन करताना समाजातील संधिसाधू लोक स्वार्थाची पोळी कशी शेकतात याचे चित्रण त्यांनी अत्यंत उपरोधाने, उपहासाने, व्याजोक्तीने तर कुठे व्यंगोक्तीने केलेले दिसते. या समारंभामुळे तालुक्यातील डेप्युटीलाही आपली शाळा व आपण किती लोकप्रिय आहोत हे शिक्षकाना दाखवायची संधी मिळते. तसेच येनकेन प्रकारेण स्वतःच्या आबाळीचे दुःख वेशीवर टांगण्याचे निमित्त मिळते.

**गोविंदा गवळी** या कथेतून नवसाच्या प्रथेची केलेली टवाळी अक्षरशः अफलातून आहे.

**पित्र्यांचे दुसरे लग्न कसे फिसकटले ?** या कथेतून बाला-जरठ विवाहाची टर उडविली आहे. खेड्यातले लोक साळसूद असतात हा समज खोटा आहे हे मार्मिकपणे दाखवून दिले आहे.

**काळ आणि कसर** ही कथा म्हणण्यापेक्षा एक नर्मविनोदी लघुनिबंधच आहे. इतिहास लेखनाची आबाळ आणि ओढूनताणून निष्कर्ष काढणाऱ्या इतिहाससंशोधकांची अत्यंत क्रूर थट्टा ऐतिह्य संमेलनाच्या वर्णनाच्या निमित्ताने सावरकरांनी केली आहे. मराठी भाषेत इंग्रजी शब्दांची अतिरेकी पखरण करणाऱ्या विद्वानांची चांगलीच टर उडवली आहे. या संमेलनातील ठरावांचे तपशील वाचताना कोल्हटकरांच्या चोरांच्या संमेलनाची आठवण होईल.

**नारदाची पुन्हा पृथ्वीस भेट** या कथेत आजचा माणूस हा देवाचीच उचलबांगडी करण्यात कसा गुंतून राहिला आहे हे विनोदाने दाखवून दिले आहे. १९ जुलै १९३५ रोजी बिहारच्या प्रलयंकारी भूकंपाच्या संदर्भात महात्मा गांधींनी असे लिहिले होते की अस्पृश्यतेच्या पापासाठी देवाने ही भूकंपाची शिक्षा दिली! असाच खुळचटपणा सन १७५५ च्या लिस्बनच्या भूकंपानंतर १५००० माणसे क्षणात मेली तेंव्हा रोमन कॅथॉलिक आणि प्रॉटेस्टंटांनी एकमेकाना पापी ठरवून देवाचा कोप झाल्याची फर्माने काढली होती. हा संदर्भ देऊन सावरकरांनी भोंदू अंधश्रद्धेवर प्रहार केले आहेत. सावरकर स्वतः अस्पृश्यतानिर्मूलनाचे खंदे पुरस्कर्ते असूनही गांधींच्या या खुळचट कारण-मीमांसेचा अहिंसानंद या पात्राच्या रूपाने सावरकरानी खरपूस समाचार घेतला आहे. येथे विज्ञान हाच विष्णूचा नवा अवतार आहे असे मानणाऱ्या सावरकरांचे विज्ञानप्रेम दिसून येते.

**एक घडलेला चुरचुरित संवाद** या पंचगव्य व गोमूत्रप्राशनाबद्दलच्या फक्कड चर्चेच्या अंगाने बेतलेल्या कथेत धर्मग्रंथात सांगितलेल्या प्रत्येक कृत्यांची तपासणी कशी जरूरीची आहे हे सांगितले आहे.

**आता मात्र दिवाळीत दुष्काळाची भीतीच नको!** या कथेतून समाजात सणांच्या व उत्सवांच्या नावाखाली जी बेसुमार उधळपट्टी होते त्यापेक्षा गोरगरीबानाच त्या पैशाने मदत केली तर मानवजातीचा प्रश्न सहज सुटेल या उदात्त विचाराचे प्रतिपादन आहे. केवळ वेदपुराणात सांगितले आहे ते सर्व आजच्या काळातही ग्राह्य ठरविणे कसे चूक आहे हे विनोदी संवादरूपाने मांडले आहे.

**नंदीबैल आणि माणूस बैल** या कथेतून भोंदूपणा व भाबडेपणाचा रोग समाजाला कसा पोखरत असतो याचे नेमके दर्शन घडविले आहे. गोसेवेच्या नावाखाली मदत गोळा करताना गरीब लाचार माणसांची तरी पिळवणूक होऊ नये हे तारतम्य न पाळणाऱ्या व गोवंशभक्तीचा बाजार मांडणाऱ्यांना खरमरीत कानपिचक्या दिलेल्या दिसतात.

**चातुर्मास्य** या कथेत रूढीतून आलेल्या कथाकल्पनांचा फोलपणा सावरकरांनी सांगितला आहे, तसेच व्रतवैकल्यांच्या नावाने होणारी नासाडी गोरगरिबांच्या उपयोगासाठी खर्च झाली तर मानवहित साधेल हा संदेशही दिला आहे.

**ताबूताची गोष्ट** या कथेत ऐहिक जगापुरता खरा धर्म म्हणजे ऐहिक विज्ञान हा विचार आहे. मात्र जाता जाता मुसलमानांचा धर्म संस्थापक महंमद पैगंबर याच्या पश्चात झालेल्या गादीसाठीच्या लढ्याचा म्हणजेच करबल्याचा रक्तरंजित इतिहास कथन करून धर्माप्रमाणे व कर्मठ निष्ठेने वागणाऱ्या मनुष्याचा सुद्धा देव पाठिराखा असतोच असे नाही हे इतिहासाच्या आधारे दाखवून दिले.

**तोतया राजा झाला** व **अंगरख्याला माणसे बेतणारा शिंपी** या दोन्ही कथा म्हणजे सत्य इतिहासकथन आहे.

**तोतया राजा** झाला ही बंगाल्यातील भोवाल संस्थानच्या मृत म्हणून घोषित पण वस्तुतः जिवंत असलेल्या राजकुंवराला स्वतःच्या पत्नीने क्षुद्र स्वार्थापोटी तोतया ठरविले पण अखेर न्यायाधीशांनी न्याय दिला हे सांगणारी बारा वर्षांच्या प्रदीर्घ न्यायालयीन लढ्याची सनसनाटी सत्यकथा आहे.

**अंगरख्याच्या** सत्यकथेत मुसलमान धर्मातील भोळेपणामुळे धूर्त तुर्की सेनापतीने खलिफा नेमताना दाखविलेली चलाखी पहा.

**बाळंतीण** या कथेत गाईला दारोदार फिरवीत तिच्या सेवेच्या नावाने भिक्षा गोळा करणाऱ्या तथाकथित गोसेवकांचे गोमाताप्रेम, पण गरीब, लाचार, आसन्नप्रसवा भिकारणीला मात्र माणुसकीशून्य वागणूक या विरोधाभासाचे चित्र रेखाटले आहे. हिंदूराष्ट्रनिष्ठा व गोपालन यात विरोध निर्माण झाल्यास राष्ट्रहत्येपेक्षा गोहत्या परवडली असे मत सावरकर मांडतात. यामध्ये करंट्या सावरकरविरोधकाना मात्र ते गोहत्येचे समर्थक होते असा जावईशोध सापडतो हे आपले दुर्दैव.

**प्रार्थना** या कथेत आता पाकिस्तानात असलेल्या पण पूर्वीच्या अखंड भारतातील क्वेट्टा येथील भूकंपाच्या वेळी झालेल्या वाताहतीचे वर्णन आहे. या परिस्थतीतही पठाण लोक निराधार हिंदू स्त्रियांवर अत्याचार करीत होते आणि गांधीजी त्या असहाय्य भगिनीना प्रार्थनेचा कोरडा उपदेश करीत होते, त्याचा सावरकरानी खरपूस समाचार घेतला आहे. " प्रार्थना ही मनुष्याची आशा आहे; आशापूर्तीची हमी नव्हे " हे सावरकरांचे भाष्य मार्मिक आहे.

**पाहिजे! काळ्या माणसाला गोरे करणारा संशोधक पाहिजे** या कथेत भारतासारख्या पौर्वात्य देशवासीयांना केवळ कृष्णवर्णीय म्हणून गौरवर्णीयांकडून हिणविले जाते या व्यथेपोटी वैज्ञानिक विचारमंथन करून अशा शोधाची आवश्यकता अधोरेखित केली आहे. आधुनिक वैज्ञानिक संशोधन पाश्चिमात्यांचे म्हणजेच गोऱ्यांचे. त्याना गोरे करण्यासाठीच्या शोधांची गरजच भासली नाही. पण भारतीयांना मात्र गोरे होणे आवश्यक आहे. म्हणून गरज तिथेच शोधाचा ध्यास या न्यायाने हा संशोधक भारतीयच असेल असा आशावाद मांडला आहे.

**गाढव संघटन** या कथेतील रूपकात हिंदुसंघटनावाद्याना माणुसकीचे प्रतिनिधी संबोधून त्यांच्या विरोधी संघटना "पॅन-गाढवीय-मजलीस-ई-आम" हिला-गाढवकीचा मान देऊन व त्या गाढवकीमध्ये सामील होणाऱ्या काही हिंदूविरोधी माणसांचे स्वागत करतेवेळी रूपक पुरेसे पारदर्शक झाले आहे. गाढवांचा नेता त्यावेळच्या अडेलतट्टू इस्लामी नेत्याप्रमाणे हिंदू-मुस्लिम एकीच्या मागे लागलेल्या मानवतावादी नेत्याला सांगतो, "गाढवांनी मनुष्याप्रमाणे वागावे म्हणजे एकी होईल, हा हिंदूसंघटनांचा उपदेश लुच्चेपणाचा आहे. विश्वप्रेमाचा जर तुम्हाला खरोखरच उमाळा आलेला असेल तर तुम्ही माणसांनीच गाढव का होऊ नये ? "

**शेंदाडपूरचा शिवाजी उत्सव** या कथेत उत्सवाच्या निमित्ताने होणाऱ्या सोहोळ्यात मुख्य उत्सवमूर्तीऐवजी अन्य हेतूंना कसे महत्त्व प्राप्त होते हे दाखविले आहे. या उत्सवाला राष्ट्रीय स्वरूप द्यायचे म्हणजे शिवाजीला न मानणाऱ्या समाजाची मर्जी सांभाळण्यासाठी तडजोडी करणे आलेच. मग त्यासाठी शिवाजीचे चरित्र मोजक्या शब्दात आटपायचे. ते असे- "मुसलमानांचा सरदार असलेला शहाजीचा पुत्र शिवाजी. त्याचा जन्म १६२७ ते १६३०च्या दरम्यान केव्हा तरी झाला. (कारण जन्मतारखेचा घोळ चालू आहे) व तो १९८० मध्ये मरण पावला." या मोजक्या चरित्राला मान्यता देणारे उत्सव समितीचे अध्यक्ष अफझलमिया सांगतात, " शिवाजी जन्मला हीच गोष्ट आमच्या भावना दुखावणारी म्हणून आम्हाला अमान्य आहे. पण तडजोडीपुरते हे चरित्र आम्ही स्वीकारतो." आजच्या काळातील निधर्मी इतिहासाचे पुनर्लेखन आठवून पहा.

**देवसकी आणि माणुसकी** या कथेत पटकीसारख्या साथीच्या रोगात वैद्यकीय उपायांऐवजी दैवी उपाय करण्याच्या अडाणीपणावर कोरडे ओढले आहेत. या निमित्ताने सावरकरानी जातीय विद्वेष पसरविणाऱ्या नेत्यांना समजावले आहे. "स्पृश्य अस्पृश्यांचा कसा छळ करतात हे जसे दाखविले पाहिजे तसेच अस्पृश्यतानिवारणार्थ निरपेक्षपणे झटणारा स्पृश्य वर्गही झपाट्याने वाढत आहे, हेही लपविता कामा नये." सावरकरांचा हा उपदेश आजच्या संदर्भात अत्यंत समर्पक आहे.

**अपघात की आत्मघात** या कथेत वेडगळपणाच्या अंधश्रद्धांवर प्रहार आहे. एक जुनाट पोखरलेला वटवृक्ष पाडावा कि न पाडावा या वादाचा शेवट तो अचानक उन्मळून त्याला वाचवण्याच्या बाजूने लढणाऱ्या भीमाबाईचाच बळी जाण्यात होतो हे दाखवून सावरकरांनी अंधश्रद्धाविरोधकाची भूमिका मांडली आहे.

**भक्तिविजयातील हरवलेला नवा अध्याय** या कथेत एका परम विठ्ठलभक्ताच्या खुनानंतर विठ्ठलाच्या मूर्तीच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या या अफवेला श्रद्धाळू ग्रामस्थांनी कसे उचलून धरले याचे विनोदी वर्णन आहे. काही वर्षापूर्वी गणपती दूध पितो या अफवेला मुख्यमंत्र्यांसकट अनेकांनी कशी मान्यता दिली होती ते आठवा.

**विटाळाचे वेड** या कथेत वर्णन केलेली विटाळ, शिवाशीव वगैरे मानण्याची प्रवृत्ती आज जवळजवळ लोप पावली आहे पण सावरकरांच्या काळात एका लांबच्या नातेवाइकाच्या मरणाच्या वार्तेमुळे निर्माण झालेल्या सुतकाच्या विटाळाच्या अतिरेकाचे पर्यवसान तथाकथित शोकमग्न माणसांच्याच मरणात कसे होते हे दाखवून विटाळ संकल्पनेवर कुठाराघात केला आहे.

तीच गोष्ट **व्रते आणि वैकल्ये** या कथेची. यामध्ये सावरकरांनी धार्मिक व्रते कालविसंगत म्हणून त्याज्य आहेत हे सांगितले आहे. ज्योतिर्गोलविषयक सर्व पूजाअर्चा साफ खोटी म्हणून त्याज्य ठरवून शनि-मंगळादि पापग्रह किंवा सूर्यचंद्रादि उपकारक ज्योतिर्गोलांचे महत्त्व सारखेच असते असे दाखवून दिले आहे. शिवाय लक्षवाती, लक्षप्रदक्षिणा, लक्षदूर्वा ही व्रते पर्यावरणास मारक म्हणून त्याज्य गणले आहे.

सावरकरांचे सारेच कथालेखन १९२७ ते १९३७ या रत्नागिरी येथील स्थानबद्धतेच्या काळांतले आहे. या काळात त्याना राजकारणात भाग घेण्यास किंवा राजकीय लेखन करण्यास बंदी होती. यामुळे या कथांमध्ये त्यांचे समाज सुधारणा विषयक विचार प्रतिबिंबित होणे अपरिहार्य आहे. यामध्ये हिंदुराष्ट्रनिष्ठा, विज्ञाननिष्ठा,व बुद्धिनिष्ठा या प्रमुख बाबी आहेत व त्याच या सर्व कथांसाठी आधारभूत आहेत. हिंदू एकता व संघटन साधण्यासाठी हिंदूंचे सण, व्रते, वैकल्ये यांचे महत्त्व सावरकर जाणून होते. म्हणून त्यातील दोषांवर प्रहार करताना सावरकरानी प्रत्येक वेळी आधुनिक, वैज्ञानिक दृष्टीचा उताराही दिला आहे.

सावरकरांचे कथालेखन हे समकालीन कथालेखनाकडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष करून झाले. म्हणूनच लघुकथा लेखनाचा प्रतिभासाधनप्रणीत मूलमंत्रही त्यानी धुडकावून लावला. कथेमध्ये गुंतागुंत, निरगाठ व उकल हा क्रमविकास किंवा अनेक प्रसंगांची चातुर्यपूर्ण गुंफण अभिप्रेत असते. पण सावरकरानी ही शिस्त कधीच जुमानली नाही.त्यांचे कथानायक, फार काय कोणतीही पात्रे, ढोबळ, बुद्धिवादी, तत्त्वज्ञानी वाटतात. संधि मिळताच ते भााषणे देऊ लागतात. कथानकाचा विकास व्यक्तीच्या स्वभावातून न होता तत्त्वचिंतनातून, तत्त्वप्रतिपादनाच्या हव्यासातून होतो. यामुळेच व्यक्तिचित्रण काहीसे कृत्रिम व नीरस होते.

सावरकरांची कथेतील भाषा प्रौढ, संस्कृतनिष्ठ, सुभाषितांची रेलचेल असलेली, विद्वत्तापूर्ण व भाषाशुद्धीचा सतत ध्यास घेणारी आहे. त्यांची क्रियापदे -प्रचलविणे, विरोधिणे, अध्ययिणे, आविर्भवणे ही शाब्दिक टाकसाळीत पाडलेली अप्रचलित नाणी फारशी चालली नाहीत तरी भाषेच्या दृष्टीने खणखणीत बावनकशी आहेत.

सावरकरांची नाटके, ऐतिहासिक लेखन, काव्ये, आत्मचरित्रलेखन, निबंध या विविध प्रकारच्या साहित्याच्या मानाने काहीशा दुलर्क्षित असलेल्या कथासृष्टीचा परिचय आपणास घडून त्या सर्व कथा मुळात वाचावयाची प्रेरणा आपणास झाली तर या विवेचनाचे सार्थक झाले असे मी समजेन. या कथा घेऊन कोणाला कथाकथनाचे कार्यक्रम करण्याची ऊर्मी आली तर उत्तमच.

-०-

SMILE PLEASE

A Teacher lecturing on population - In India after Every 10 sec a woman gives birth to a kid

A Sardar stands up- we must find & stop her!.



# आधी वंदू तुज मोरया!

विनायक केशव मराठे (पृ.२०), वरळी. दूरध्वनी २४३०३३२९

*(हा अंक आपल्या हातात पडेल त्यावेळच्या आगेमागे सर्वत्र गणेशोत्सवाचे वातावरण असेल. व्ही.के.आपल्याला त्यांच्या आठवणीतल्या गणेशाचे दर्शन घडवीत आहेत. तेव्हा आपल्यासुद्धा स्मृती नक्कीच चाळवून जातील, होय ना? - संपादिका)*

भाद्रपदाला सुरुवातच मुळी गणेशाच्या आगमनाने होते. मेघगर्जनेच्या तालावर धुंदपणे थयथयाट करणाऱ्या विद्युल्लहरी काहीशा विसावतात. आषाढ श्रावणात धरणीमातेच्या अंगाखांद्यावर खेळणाऱ्या खट्याळ श्रावणसरी भानावर येतात. नद्या, नाले, विहिरी, तलाव पाण्याने तुडुंब भरतात. पोटभर पाणी पिऊन तृप्त झालेली, लोंब्यांनी झुकलेली पिकं शेतकऱ्यांच्या खळ्यात मोत्यांची रास घालण्यासाठी आतुर होतात.

अशा पोटभरल्या वातावरणात चतुर्थीचा मुहूर्त साधून गणाधिराज मखरस्थ होतात.

भले, काही लोकांना गणपति हे सोवळ्यात गुरफटलेले, कर्मकांडात एकादी नकळत चूक झाली तरी कडक शिक्षा करणारे दैवत वाटत असेल. पण खरं सांगू? मला मात्र गणपती हा विविध कलांचा मनसोक्त आस्वाद घेणारा, बुद्धी आणि भावना यांची सुंदर गुंफण घालणारा, चवीने भरपूर खाणारा खवय्या, मोकळ्या मनाने आणि मोकळ्या हातानी भरभरून देणारा, आणि सर्वात श्रेष्ठ म्हणजे आईवर मनस्वी प्रेम करणारा माझा जिवाभावाचा सखा वाटतो. कधी श्रावण संपतो आणि कधी मला हवाहवासा वाटणारा पाहुणा - छे, माझा परम सखा माझ्याकडे येतो असं होऊन जातं. ही प्रसन्नमूर्ती, मंगलमूर्ती घराघरात रमते. तेवढीच, किंबहुना कांकणभर जास्त, जन समुदायात रमते.

माझं अर्ध आयुष्य गिरगांवातल्या चाळीत गेलं. सगळ्या चाळकऱ्यांनी एकत्र येऊन सणवार, उत्सव, विवाह समारंभ पार पाडायचे हा गुरुमंत्र अगदी लहानपणापासूनच प्राप्त झाला. आमच्या चाळीत गेली पांच नव्हे, पन्नास नव्हे, सतत एकशे बारा वर्षे गणेशोत्सव साजरा होत आहे. कोणताही भेदाभेद न मानता एकत्र येऊन काम करण्याचे गणेशोत्सव हे एक व्यासपीठ आहे. चाळीतल्या उत्सव समितीचा एक अलिखित नियम आहे. चाळीबाहेरच्या जगात चाळकरी जेवढे प्रतिष्ठेचे, मानाचे स्थान धारण करतो तेवढे अगदी क्षुल्लक वाटणारे काम उत्सवात गणेशसेवा म्हणून करायचे हा संकेत गेली ११२ वर्षे अव्याहत अंमलात आहे. बडी बडी धेंडं झाडू मारताना, उष्टी काढताना, मंडप घालताना महा प्रसादाच्या वेळी कमरेला पंचा घट्ट आवळून वल्लभाचार्य म्हणून काम करताना पाहून त्यांची मंडळी लाज लाज लाजतात. तुम्हाला नाही हे जमणार, मी येऊ का? असं हातवारे करीत वरच्या गॅलरीतून येणारे आवाज मखरातले गणपती गमतीने बघत असतात. उदाहरण द्यायचे तर पोस्टातला पोस्टमन कार्याध्यक्ष होतो आणि कॉलेजचे प्राचार्य त्याचे कनिष्ठ मदतनीस होतात. स्वयंपाक कला जाणणारा, एका किराणा मालाच्या दुकानात साधा नोकर म्हणून काम करणारा चाळकरी महाप्रसादाच्या दिवशी मार्गदर्शक बनतो आणि बँक मॅनेजर वा सरकारी अधिकारी निमूटपणे त्याच्या सांगण्याप्रमाणे स्वयंपाक करतात. हे सर्व प्रसंग आठवले म्हणजे वाटतं, उगीच ही पुण्यभूमी सोडली आणि दिखाऊ माणसांच्या जगात आलो.

आमच्या उत्सवात अजूनही कीर्तन, प्रवचन, स्थानिक भजन, गणेश याग, अन्नकोट, महाप्रसाद हे कार्यक्रम होतात. प्रवचनांतलं एक अक्षरही न समजता आम्ही लहानपणी पेंगत शेवटपर्यंत बसत असूं .कारण प्रवचन संपल्यावर प्रवचनकार न चुकता आम्हाला साखरफुटाणे देत असत.

गमतीचा भाग सोडला तरी उत्सवामध्ये हे कीर्तनकार निरनिराळे किस्से सांगत. पौराणिक कथा कधी करुणरसात सजवून सांगत. गणेशाच्या दोन पुराणकथा माझ्या अजूनही लक्षात आहेत. कारण अशा कथा मी कधीही कोणत्याही ग्रंथात वाचल्या नाहीत वा कुणा पंडिताकडून ऐकल्या नाहीत. या कथा खऱ्या की खोट्या हा प्रश्नच उद्भवत नाही. कारण पुराण काळातले कोणते अस्सल पुरावे गोळा करणार? पुराणातल्या कथाना कल्पनाशक्तीची पुटं चढवलेली असतात. भक्तीभावाच्या कोषात त्या दडलेल्या असतात. पण बऱ्याच कथाना उत्तम साहित्यिक मूल्यही आहे.

त्यातील एक कथा अशी की भाद्रपदातल्या गणेशचतुर्थीला गणेशाचा जन्म झाला नाही. अर्थात ती चतुर्थी त्याचा जन्मदिन नाही. तो त्याचा विजयदिन आहे. गणेशकाळी आपल्या मातृभूमीवर असुरांचे, दैत्यांचे प्रचंड आक्रमण झाले. गणेश हा गणपती. शिवगणांचा मुख्य सेनापती. आक्रमकांना हुसकावून लावल्याशिवाय मातापित्यांचे तोंड पाहाणार नाही. अशी प्रतिज्ञा करून गणेशाने त्या संहारक रणसंग्रामात शत्रू सैन्याचा दारुण पराभव केला. आणि चतुर्थीच्या पवित्र दिवशी तो रणगृही परतला. पराक्रमी पुत्राची विजयवार्ता ऐकून पार्वती मातेचा ऊर भरून आला. गणेश घरी येईपर्यंत न थांबता ही वीरमाता स्वतः गणेशाच्या रणगृही आली. पुत्राचं पोटभर कौतुक केलं. एक दिवस राहिली तो गौरीचा सण. आणी गणेशाला घेऊन घरी गेली तो गौरी गणपती विसर्जनाचा दिवस. विसर्जन म्हणजे दुसऱ्या अर्थी प्रस्थान हलविणे.

दुसरी कथा तर खरोखरच रोमहर्षक आहे. हा दारुण रणसंग्राम समाप्त झाल्यानंतर सर्व शिवगण आपआपल्या घरी परतण्यापूर्वी प्रमुख सेनापतीचा निरोप घेण्यासाठी एकत्र आले. गणेशावर स्तुतिसुमनांचा वर्षाव होऊ लागला. गणेशाला हा प्रकार आवडला नाही. गजचर्मानी बनविलेलं, हस्तीमुखाचं आकार असलेलं शिरस्त्राण त्यानी धारण केलं आणि शिवगणाला उद्देशून म्हणाला, बस्स! ही व्यक्तीपूजा पुरे झाली.सेनापती हा सेनापती असतो.ती व्यक्ती कोणती असते याला महत्त्व नाही. या शिरस्त्राणाआड आज मी आहे, उद्या दुसरा सेनापती असेल. तेव्हा माझ्या चेहऱ्यावर प्रेम करण्यापेक्षा या शिरस्त्राणावर प्रेम करा. माझ्या देहावर शिर नाही हे शिरस्त्राण आहे, असं समजा.

या कथा म्हणजे कदाचित कीर्तनकाराच्या

(पुढील मजकूर पृ. १० वर)



# माहेरच्या अंगणात-(१)

## आमची वहिनी-एक उद्योगी महिला

सौ. वृषाली वामन मराठे (पृ. ५०३) जोगेश्वरी पू. दूरध्वनी-२८२६९४०२

*( हितगुजच्या मार्च च्या अंकात आपले ज्येष्ठ सदस्य श्री.वि.के मराठे यांच्या सूचनेप्रमाणे माहेरच्या अंगणात या नवीन सदराचे माध्यमातून आपल्या भगिनीनी माहेरच्या ह्द्य आठवणी पाठवाव्यात असे आवाहन केले होते. त्याला अनुसरून हा पहिला लेख प्रतिष्ठानचे संकल्पक श्री वा.ग. मराठे यांच्याच सौभाग्यवतींचा असावा हा एक सुयोगच आहे. या सदरातून अधिकाधिक कुल भगिनीनी आपले अनुभव व्यक्त करावेत अशी अपेक्षा आहे.*

आमची वहिनी ही फक्त आमच्या भावंडांची नव्हती तर सगळ्या समर्थनगरची होती.तसेच तिच्या कारखान्यातील सर्व कामगारांची ती आवडती होती.

आताची प्रतिमा प्रभाकर बेहेरे म्हणजेच पूर्वाश्रमींची सगुणा नारायण जोशी. म्हणजेच आंजर्लेकर शास्त्री यांची मुलगी होय. सगुणोक्षा सर्वगुणी हेच विशेषण तिला योग्य ठरते. कारण तिचे गुण वर्णावे तेवढे थोडेच.दिसायला सुंदर, शांत स्वभाव व हंसतमुख चेहरा तसेच पाहुण्यांचे आदरातिथ्य करण्यात ती कधीच कमी पडली नाही.त्यात तिला दोन्ही सुनांची साथ असते.

त्यांच्या लग्नाला ५० वर्षे झाली पण माझा व तिचा सहवास जवळजवळ ६० वर्षांचा आहे. म्हणजे आता नाही. १९६९ साली आम्ही ठाण्याहून गोरेगांवला राहायला आलो. माझी वहिनी जोगेश्वरीला तर मी आणि माझी धाकटी बहीण क्षमा शाळा कॉलेजात जाणाऱ्या.माझी मोठी बहीण नोकरी करत असे. तशा आमच्या विशेष ओळखी पण नव्हत्या. त्यामुळे आम्ही तर ऊठसूट वहिनीकडेच जात असू. त्यानंतर विनयचा जन्म झाला. त्याच्या तर बारशापासून व मुलीच्या वाढदिवसापर्यंत एकही घरगुती प्रसंग आता चुकवत नसूं. त्यामुळे माझी हजेरी नव्हती असा प्रसंग विरळाच ! शिवाय आमच्या घरचा कुठलाही प्रसंग असो. माझ्या केळवणापासून तो सुनेच्या मंगळागौरीपर्यंतही वहिनीची हजेरी असायचीच. माझे वडील सुद्धा आज मी वहिनीला भेटून येतो असे म्हणायचे. येताना नारळ, पापड, पोहे किंवा कांही तरी आमच्या माहेरचे जिन्नस असायचेच. दोनतीन प्रसंग नमूद करावेसे वाटतात ते असेः ५-६ वर्षांपूर्वी मी आजारी होते. आम्ही तेंव्हा नेरूळ(नवी मुंबई )हून मालाडला दर आठ दिवसांनी डॉक्टरकडे जाण्यासाठी येत असूं. त्यावेळी तर २-३वेळा हक्कानेच राहिल्याचे आठवते. त्यानंतर मुलाची नोकरी सीप्जमध्ये. हे रिटायर झालेले. त्यामुळे ऑफिसची जागा सोडावी लागली. आणि वहिनीच्याच बिल्डिंगमध्ये राहायला आलो. आम्ही सातव्या मजल्यावर व वहिनी पहिल्या मजल्यावर. त्यामुळे एकहि दिवस असा गेला नसेल की आम्ही त्यांच्या कडे गेलो नाही. आमचा मन्याअण्णा (माझा भाऊ) तसा अबोलच. पण ती उणीव वहिनी भरुन काढत असे. तिच्याशी बोलायला कुठलाही विषय चाले. मीच काय, आमचे हे सुद्धा अगदी मोकळेपणाने गप्पा मारत. काही गोष्टी मला माहित नसत पण वहिनीला आधीच कळत. मुलालाच नाही तर सुनेलाही परकेपणा वाटत नसे.सुनेचे आईवडीलही इथे आल्यावर अगदी न चुकता खाली जाऊन भेटत असत. ती स्वतः १२ वर्षे डायलेसिसवर होती तरी पण चेहऱ्यावर दुःखाची एकही सुरकुती नसे. तिला कितीहि त्रास झाला तरी पहाटेपासून तिची स्तोत्रे भूपाळी सर्व चालू असे. खालून जाणाऱ्या येणाऱ्या वाटसरूनाही ते ऐकावेसे वाटे. तिची सहनशक्ती जबर होती. तिचेच उदाहरण आम्ही सर्वांना नेहमी देतो.

शेवटचा प्रसंग म्हणजे २४ डिसेंबरला तिच्या भाच्याच्या लग्नाला घरांतील सर्वच मंडळी जाणार होती. त्यामुळे ती सुनांना म्हणाली की मी कल्पनाकडे राहीन. तुम्ही माझी काळजी करू नका. त्याप्रमाणे ती आली, राहिली व विशेष म्हणजे आम्हा सगळ्यानाच विशेषतः सुनेलासुद्धा बरे वाटले. दुसऱ्या दिवशी चार पावलेही ती चालू शकत नव्हती.ती फार थकली होती.त्या दिवशी ती आपणहून जेवली. माझ्या सुनेकडूनही काय हवं नको ते घेतलं, व ती निघाली तेव्हा तर मला माझ्या आईची आठवण झाली.कारण तिच्या शेवटच्या दिवसात आम्हालाच तिला भरवावं लागत होतं. क्षणभर मी वहिनीमध्येच माईचं रूप पहात असल्याचं जाणवत होतं.

त्यानंतर तिला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलं. शेवटचीच वेळ असावी असे वाटल्यावरून मी व हे जाऊन भेटलो, बोललो. पण येताना आम्ही खिन्न व विषण्ण मनाने जड पावलाने हॉस्पिटल सोडले. आणि शेवटी ४ जानेवारीलाच तिने या जगाचा निरोप घेतला.

अशा आमच्या वहिनीच्या राहिल्या फक्त आठवणी. ती एक उद्योगी महिला होती. समितीच्या कामाला , आपत्काळी स्वकीयानाच जेव्हा आधार हवा असे तेंव्हा ती तो आधार देईच पण निसर्गाच्या आपत्तीलाही ती इतर महिलाना बोलावून सहकार्य देई. अशा प्रकारे निराधार व गरीब दीन दुबळ्याना मदत करण्यासाठी तिचे हात नेहमीच पुढे सरसावत.

-०-

## ए क बूँद पानीका

-वा.ग.मराठे (पृ.५०३),जोगेश्वरी-पू.
दूरध्वनी २८२६९४०२

एक बूँद पानीका।
पता नही कब पीनेका ।
सालोंसाल तरसता रहा ।
बहोत बरसात हुआ ।
लेकिन पानीका क्या हुवा ?
सभी तो बोलते है।
नये पैप डलते हे।
टैंकर तो चलते चलाते है।
लोग प्रतीक्षामे डूबे हैं ।
एलकसन होते है ।
सभी सीट जितते है।
अध्यक्षके लिये पार्टी भूलते है ।
लेकिन मतदाता तो जिंदा है ।
पता नही मतदाताको।
कौन जीता या कौन हारा ।
लेकिन पानीका क्या हुवा ?
वही हुवा जो होना था ।
बच्चा बूढा पानी-पानी कर गुजरा ।

-०-

# ENGLISH SECTION

## (1)Time is money ?

Son: " Daddy, may I ask you a question?"
Daddy: "Yeah sure,what it is?"
Son: "Dad, how much do you make an hour"
Daddy: "That's none of your business. Why do you ask such a thing?"
Son: "I just want to know. Please tell me, how much do you make an hour?"
Daddy: "I make Rs.500 an hour"
"Oh", the little boy replied, with his head down. Looking up, he said, "Dad, may I please borrow Rs. 300?"
The father was furious.
"If the only reason you asked that is so you can borrow some money to buy a silly toy or other nonsense, then march yourself to your room and go to bed.Think why you are being so selfish. I work hard everyday for such this childish behavior"
The little boy quietly went to his room and shut the door.
The man sat down and started to get even angrier about the little boy's questions.How dare he ask such questions only to get some money?
After about an hour or so, the man had calmed down, and started to think: "May be there was something he really needed to buy with that Rs. 300 and he really didn't ask for money very often!"
The man went to the door of little boy's room and opened the door.
"Are you asleep, son?" He asked.
"No daddy, I'm awake," replied the boy.
"I've been thinking, may be I was too hard on you earlier", said the man, "It's been a long day and I took out my aggravation on you. Here's the Rs.300 you asked for"
The little boy sat straight up, smiling "oh thank you dad!" He yelled.
Then, reaching under his pillow he pulled some crippled up notes. The man, seeing that the boy already had money, started to get angry again.
The little boy slowly counted out his money, then looked up at his father.
"Why do you want money if you already had some? " the father grumbled.
"Because I didn't have enough, but now I do," the little boy replied."Daddy I have Rs. 500 now. Can I buy an hour of your time? Please come home early tomorrow. I would like to have dinner with you"

**Moral of the Story**

It's just a short reminder to all of you working so hard in life.
We should not let time slip through our fingers without having spent some time with those who really matter to us, those close to our hearts.
If we die tomorrow, the company that we are working for could easily replace us in a matter of days.
But the family & friends we leave behind will feel the loss for the rest of their lives. And come to think of it, we pour ourselves more into work than to our family

-0-

## (2) ' LEGAL' JOKES

Lawyers should never ask grandmas a question if they aren't prepared for the answer.

In a trial, at a small-town, the prosecuting Attorney called his first witness, an elderly grandmother to the stand. He approached her and asked; "Mrs.. Jones, do you know me?"

She responded, "Why, yes, I do know you, Mr.Williams. I have known you since you were a young boy, and frankly, you are a big disappointment to me. You lie, cheat on your wife, manipulate people and talk about them behind their backs. You think you're a big shot when you haven't the brains to realize you never will amount to anything more than a two-bit paper pusher. Yes, I know you."

The lawyer was stunned! Not knowing what else to do, he pointed across the room and asked, "Mrs.. Jones, do you know the defense attorney?"

She again replied, "Why, yes, I do. I've known Mr. Bradley since he was a youngster. He's lazy, bigoted, and has a drinking problem. He can't build a normal relationship with anyone and his law practice is one of the worst in the state. Not to mention he cheated on his wife with three different women.

One of them was your wife. Yes I know him."

The defense attorney almost died.

The judge asked both lawyers to approach the bench and in a quiet voice said:
"If either of you rascals asks her if she knows me, I'll send you to the electric chair.".

-0-

## (3) PUNERI HINDI

1.Pahili baar, pohne gaya to kya hua maloom? Pahile paani mein shira, Phir Poha aur baad mein buda.
2.Ghai karo Bhaiyya, Nahi to Bus Jayegi aur humaari Panchaiit hoyengi!
3.Sarbat Mein Limbu Pilaa Kya?
4.Itna Mahaag kaise re tere yahaan?
5.Woh Kopre ka bhaiyya to svasta deta hai!
6.Kaanda kaat ke, Chir ke mast omlete banane ka, aur upar se thoda kothimbir bhurbhuraneka!
7.Arre Baba, Gaadi savli mein laga!
8.Eh Bhai, Medu Wada shepret laana, sambar mein budake mat laana!
9.Kes ekdum bareek kaapo bhaiyya!
10.Khao Potbhar khao, laazo mat!
11.Dhaavte Dhaavte girya to kaadkan haat ka haad modya .

-0-



# मराठे युवा वर्गासाठी आवाहन

हेमंत अरुण मराठे, (पृ.२१) ,सह-कार्यवाह
नालासोपारा, F ९५२५०-२४३३०३८

आपण सर्वच मराठे म्हणजे एकमेकांचे भाऊभाऊ,भाऊबहिणी. आमच्या प्रत्येक सभेमध्ये व संमेलनामध्ये हमखास एक प्रश्न चर्चेला येतो. तो म्हणजे तरुणवर्गाची अनास्था! भावाबहिणींनो, आपण हितगुज नित्यनेमाने वाचत असाल तर आपल्या मनाला विचारा, एकदा तरी आपण आईबाबांच्या मागे लागून प्रतिष्ठानच्या कोणत्याही कार्यक्रमाला आला आहात का ? त्याचे काय उत्तर येईल त्यावर स्वतःच विचार करावा. ह्यानंतर आपली मते आम्हाला जरूर कळवावीत.

आपणास असे वाटेल आता जग एवढे बदलले आहे तेंव्हा हे फक्त मराठे, मराठे करून कसे चालेल ? बरोबर आहे. मात्र जग जरी बदलले तरी समाजामध्ये आपण जर डोकावून पाहिले तर चित्र वेगळेच दिसेल. पहिली गोष्ट, समाज कसा बनतो ? आपलं घर, आपले नातेवाईक, त्यानंतर शेजारी, तर गांवातील अगर शहरातील लोक असे वाढत जाऊन पूर्ण समाज बनतो. असा एकच समूह एकत्र येऊ शकत नाही. त्यामुळे आपण व आपले नातेवाईक म्हणजेच आपले आडनांव बंधू मिळून एक छोटा समाज तयार होतो. अशा छोट्या छोट्या समाजाने एकत्र येऊन आपला उत्कर्ष करावयाचा असतो.

आपल्याच लोकांकडून कौतुक करून घेणे हे आपल्या सारख्या विद्यार्थी विद्यार्थिनींना आनंदाचे वाटले पाहिजे. म्हणून आपण मराठे प्रतिष्ठानतर्फे विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रम करतो. त्याला आपण वेळात वेळ काढून येणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्यच आहे.

यावर्षी आम्ही थोडा बदल केला आहे. आपणास सभेला येण्याची इच्छा नसते, ठीक आहे. आता आम्ही वार्षिक सभा अगोदरच घेतली आहे. त्यामुळे आता गुणगौरव कार्यक्रम वेगळा करणार आहोत. खरे तर हा कार्यक्रम तुम्ही मुलांनीच करावा जेणेकरून तुमच्या कलागुणांना वाव देता येईल अशी आमची मनापासून इच्छा असते. पण त्यासाठी अगोदर आपणाकडून आपण कोणत्या प्रकारची कला सादर करू शकता याची माहिती आमच्याकडे संग्रहित असणे आवश्यक आहे. त्यामुळे आपणास असे आवाहन करतो की आपले कलामंच संयोजक श्री. सदानंद विष्णू उर्फ भाऊ मराठे यांचेशी संपर्क साधून आपला कला विषयक बायो डाटा त्यांच्या पत्त्यावर त्वरित पाठवावे याविषयीचे निवेदन याच अंकात अन्यत्र छापले आहेच. असो. -०-

# युवा कलाकारांसाठी आवाहन

संयोजक-भाऊ मराठे

मराठे कुलबांधवांना आपले कलागुण सादर करता यावेत यासाठी **'मराठे कलामंच'** हे नवीन व्यासपीठ निर्माण करण्याची योजना आखत आहोत. या योजने अंतर्गत गायन, वादन, कथाकथन, कवितावाचन, अभिनय, नकला, विविध छंद, अशा कलांचा समावेश करण्यात येणार आहे. या व्यासपीठावरून आपली कला ज्या कुलबांधवांना सादर करावयाची असेल त्यांनी खालील पत्यावर लेखी संपर्क साधावाः

**सदानंद विष्णू (भाऊ) मराठे**
**नीलमणी, ३२ शिवाजी पार्क, राऊत रोड, दादर प.-मुंबई ४०००२८;**
**F२४४४८६४८/९८२१३६६२५२**

(वि.सू.- या वर्षीच्या पारितोषिक वितरण समारंभाचे वेळी दि. १३ ऑक्टोबर २००७ रोजी नातूबाग, नौपाडा, ठाणे येथे सायंकाळी ५ वा. श्री. भाऊ मराठे यांचा 'भाऊचा धक्का' हा रंजक कार्यक्रम होणार आहे. त्यावेळी आपण प्रत्यक्ष भेटूनही आपला लेखी बायोडेटा देऊ शकाल.)




# 'आम्ही मराठे'

सौ. प्रतिभा सुधाकर मराठे,
'मनसुबा',गडकरी मार्ग,नौपाडा, ठाणे ४००६०२.फोन २५४२०७७१

मराठे -मला भावलेले
माझे **तीन दीर**,असे **चौघे** भाऊ *१
एका घरात खेळलेले, एका संस्कृतीत वाढलेले
एकमेकांशी मोकळे बोलताना
कधीच नाही पाहिले ।।
आम्ही **चौघी** जावा, **चार** घरातून आलेल्या *२
आचार विचार संस्कार, रंग आमचा वेगळा
छानच जमला होता आमचा एक चौफुला ।।
सगळे **आमचे पुतणे**,स्वभावाने चांगले *३
आपापल्या संसारात आहेत ते रमले.
**सतीश** आणि **मिलिंद**, झोकून देतात कामात
**सुधीर** मात्र रमतो, वेगवेगळ्या समारंभात
**गिरीश** नेहमीच राखतो, सुरेखसा समतोल
**अजित** जरा अबोल, आणि हळू त्याचे बोल।।
माझ्यासारखीच आहे सून मोठी शिष्ट
**वृषाली** मात्र आहे सर्वामध्ये स्मार्ट *४
**भारती** तशी आहे आदर्श सून *५
पहा बरे तुम्हाला पटते का खूण
**आसावरी** आहे खूपच शांत *६
म्हणूनच तिला न पडे कशाची भ्रांत
नावाप्रमाणेच आहे **स्मिता** धाकटी हसरी *७
**सुजाता**त हे गुण लावतात हजेरी *८
ती आहे अबोल, पटतात ना माझे बोल ?।।
**दोन** आमच्या **पुतण्या**,
त्या नाहीत फारशा उण्या.
**अलका**ला आहे अतीव अगत्य *९
त्यामानाने **जया** वाटते जरा अलिप्त।। *१०
**नातवंडे** आहेत आमची सारीच गोड *११-१२
ही तर असावी पूर्वजन्मीची जोड

आशीर्वाद आहे आमचा सर्वांना
मान,सन्मान प्रतिष्ठा लाभो सदा सकलाना।।




***आम्ही मराठे या काव्यातील व्यक्तींचे उल्लेख कुलवृत्तांत पृ.१२८वर वरीलप्रमाणे पहावे.सीगोखां,सहसंपादक.**

('युद्ध आमुचे सुरू' पृ. १ वरून)

विघटन करण्यात सरसावलेले दिसतात! अशा परिस्थितीत हा ग्रंथ निश्चितपणे मार्गदर्शक ठरेल!

## हिंदू अल्पसंख्य होण्याचा धोका

दि. ७ एप्रिल २००७ ला उत्तर प्रदेशातील उच्च न्यायालयाने मुसलमान हे अल्पसंख्य नसल्याचा वास्तवपूर्ण पण अनपेक्षित निर्णय घोषित केला. त्यामुळे अल्पसंख्य म्हणून मुसलमानांना प्रत्येक क्षेत्रात मिळणाऱ्या सवलती आणि विशेष लाभ पुढे मिळण्याचे बंद होईल असे स्पष्ट झाले.... या निर्णयावर केवळ मुस्लिमांच्याच नव्हे तर मतांसाठी त्यांचे लांगूलचालन करणाऱ्या तथाकथित धर्मनिरपेक्ष संस्था संघटनांनी कठोर आणि तीव्र विरोध करणाऱ्या प्रतिक्रिया प्रकाशित केल्या! आश्चर्य म्हणजे दोनच दिवसात उच्च न्यायालयाने पहिल्या घोषित निर्णयाला स्थगिती दिली!!

लेखिका अनुराधा खोत लिखित या ग्रंथात आपल्या पारदर्शक लेखन शैलीद्वारे श्री. विक्रम सावरकरांनी चालविलेल्या आंदोलनांचे फलित अजूनहि प्राप्त झालेले नाही. तर ती आंदोलने अधिक तीव्रतेने देशभक्त जनतेने चालवून यशस्वी करण्याची आवश्यकता प्रकर्षाने जाणवते. हे दाहक सत्य याकरिताच नमूद केले आहे की त्यामुळे या ग्रंथाचे वर्तमानकाळातील महत्त्व वाचकांच्या लक्षात यावे. हा ग्रंथ केवळ इतिहास म्हणून नव्हे तर नजिकच्या भविष्यकाळात लेखिकेने मनोगतात म्हटल्याप्रमाणे देशभक्तांसाठी मार्गदर्शक दीपस्तंभ ठरावा.

## लेखिकेचे प्रदीर्घ परिश्रम

अनुराधा खोत यांनी ग्रंथात व्यक्त केलेले 'मनोगत' त्यांनी ग्रंथ सिद्ध करण्यासाठी घेतलेल्या अथक परिश्रमांची यथार्थ जाणीव वाचकांना करून देते. श्री. विक्रमरावांच्या प्रदीर्घ संघर्षमय कार्याची नोंद करताना त्यांनी तत्कालीन संदर्भ पुराव्यानिशी सादर केलेल्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक प्रयत्नांमागच्या निश्चित विचारसरणीचे विश्लेषण नुसतेच अभ्यासपूर्ण नसून नवीन युवापिढीला दिशादर्शन करणारे ठरते. वर्तमान परिस्थितीत देशाच्या रक्षणार्थ युवा देशभक्तांनी कशी कार्यवाही केली पाहिजे, याचा जणू वस्तुपाठच लेखिकेने या चरित्रग्रंथाच्या माध्यमातून सादर केला आहे. खरं तर 'समीक्षा' या शब्दाना न्याय देण्यायोग्य प्रदीर्घ लेख जागेच्या अभावी लिहिणे शक्य नाही. तरीही ग्रंथाची विशेषता येथे नमूद करणे योग्य ठरेल. चरित्रनायक श्री. विक्रम सावरकर यांच्या कर्तृत्व आणि नेतृत्व गुणांचा आलेख लेखिकेने अजिबात कंटाळवाणा होऊ दिला नाही. त्यांची वैशिष्ट्यपूर्ण पत्रकारिता, केवळ त्यांनी सदतीस वर्षे संपादित केलेल्या प्रज्वलंत नियतकालिकांतील उदाहरणे देऊनच नव्हे, तर त्यान प्रचलित राजकीय कार्याविषयी संबोधित केलेल्या पत्र परिषदेतील नेमकी गुणवत्ता व स्पष्टोक्ती ग्रंथात सादर केल्याने तो अधिकच परिणामकारक ठरतो.

## यशोपयशाच्या पलिकडे

लौकिक दृष्ट्या सर्वसामान्यांना आकर्षित करणारे सन्मान विक्रमराव सावरकरांना यथार्थपणे जरी मिळाले नाहीत तरी ते पूर्णतः दुर्लक्षिलेही गेले नाहीत हे लेखिकेने अतिशय कुशलतेने ग्रंथात व्यक्त केले आहे.

आपला देश जर अखंड, बलसंपन्न आणि सर्वांगीण प्रगतीसह विश्वात अग्रेसर व्हावयाचा असेल, तर स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या राजनीतीचा अंगिकार केल्यावाचून पर्याय नाही; असा साधार निष्कर्ष या ग्रंथातून व्यक्त केला आहे. भले, या निष्कर्षासाठी सर्वच वाचकांची सहमती होऊ शकली नाही, असा ठाम विश्वास लेखिकेने ग्रंथातील 'अश्वत्थाचा कोंब' या अखेरच्या प्रकरणात व्यक्त केला आहे.

राजकीय महत्त्वाच्या या ग्रंथात क्रांतिकारक सावरकर घराण्याची पार्श्वभूमी- श्री. विक्रम सावरकरांच्या कुटुंबियांनी दिलेले सहकार्य - त्यांच्या निष्ठावंत सहकारी आणि अनुयायी यांनी निरपेक्षतेने देशकार्यात दिलेले योगदान - श्री. विक्रमराव आणि सौ.स्वामिनी यांची ललित शैलीत परंतु वास्तविक रूपात सादर केलेली माहिती चरित्राचा व्यापक आशय ध्यानात आणून देतात.

## विशुद्ध मराठी भाषा

अलिकडे 'मराठी' म्हणून वाचल्या जाणाऱ्या दैनिकात बहुतेक ग्रंथात, बोलपट आणि दूरदर्शन मालिकांत अनावश्यक इंग्रजी वा उर्दू शब्दांची भेसळ केलेली आढळते! जणु काही प्रत्येक वाक्यात इंग्रजी शब्द उपयोगात आणल्याशिवाय आशय पूर्ण होत नाही असे गृहीत धरूनच आपली मराठी सांगितली जाते. या पार्श्वभूमीवर 'अमृतातेही पैजा जिंकणाऱ्या' विशुद्ध मराठी भाषेत लिहिणाऱ्या पु. भा. भावे, डॉ. वि. स. जोग या सन्माननीय लेखकांच्या पंगतीत बसणाऱ्या विशुद्ध मराठी भाषेत लेखन केल्याबद्दल लेखिका अनुराधा खोत यांचे विशेष अभिनंदन करावेसे वाटते.

उत्कृष्ट छपाई, मनोवेधक मुखपृष्ठ आणि तितकाच महत्त्वाचा संदेश देणारे- सामर्थ्य आहे चळवळीचे या मथळ्याचे प्रेरणादायक संदेश देणारे मलपृष्ठ या सर्व गोष्टी देखण्या स्वरूपात सादर केल्याबद्दल मनोरमा प्रकाशनाचे अभिनंदन!

**युद्ध आमुचे सुरू**
लेखिका- श्रीमती अनुराधा वसंत खोत
**पृष्ठसंख्या-६२४;** मूल्य-पाचशे रुपये.
मनोरमा प्रकाशन, दादर मुंबई ४०००१४

---

(आधी वंदू तुज मोरया - पृ. ६ वरून)

कल्पनाशक्तीचा विलास असेल. गणेशासारख्या वैदिक देवतांचं हे अति मानुषीकरण असेल. पण माझ्यासारख्या सामान्य माणसाला गणेश ही एक दैवी शक्ती आहे. ती निर्गुण आहे, वगैरे तत्त्वज्ञान समजणार नाही, पचणार नाही. मी या शक्तीला मानवी स्वरूपातच पाहणार. भले, ही शक्ती सर्वगुणसंपन्न असेल. पण मला मात्र मोदक खाणारा, भक्तांवर, आईवर मनस्वी प्रेम करणारा, सतत हसतमुख असणारा, मंगलमूर्ती गजाननच अधिक भावतो. या कथा काल्पनिकही असतील कदाचित. पण श्रद्धेने मी त्याना सजीव करतो. कारण त्या मला भावतात. माझा परमसखा नुसताच कलाप्रेमी, विद्याप्रेमी, मातृप्रेमी, भ्रातृप्रेमी नाही तर तो रणधुरंधर सेनापती आणि व्यक्तीला न पाहता त्याच्या कर्तृत्वाला पहा हा उपदेश पचनी पडणारा व त्यानुरूप स्वतःला मुखवट्याआड ठेवणारा आहे. ही गोष्ट मला लाखमोलाची वाटते. इतर व्याख्या, जन्मकथा, बालकथा, मी नाकारतो.

अजूनही गणेशविसर्जनाच्या दिवशी मी जनसागरानी फुललेल्या गिरगांव चौपाटीवर रेंगाळतो, माझी माणसं भेटतात का ते पाहण्यासाठी आणि माझ्या परममित्राचा कौतुक सोहळा पाहण्यासाठी.

तुम्हालाही हा अनुभव आला असेल, खरं ना?

-०-

## मराठे प्रतिष्ठान दैनंदिनी २००८

**१०० रुपयात आपले नांव छापलेली डायरी मिळवा.**
**नोंदणीची सुधारित मुदत १५-९-२००७; त्वरा करा.**

आता २००८ सालची डायरी काढण्याचा निश्चय पक्का आहे. या डायरीमध्ये प्रत्येक दिवसासाठी (शनिवार व रविवार सहित) पूर्ण पान असेल. पृष्ठदानाची कल्पनाही राबवली जाईल. ही डायरी ४०० पानांची असून त्यातील ३६५ पाने पृष्ठदानाची असतील. ३५ पानांमध्ये विविध विषयांवरील उपयुक्त माहिती व जाहिराती असतील. अनेक कुलबांधवांच्या सूचनेनुसार डायरीला गेल्या वर्षी प्रमाणेच प्लॅस्टिक कव्हर किंवा लॅमिनेशन केलेले असेल.

यंदाही **पृष्ठदानासाठी १०० रु.** निश्चित केले आहेत. आपल्या स्वतःचा, मुलांचा, बायको, बहीण, भाऊ, आई, वडील यांचे वाढदिवस किंवा कोणाच्या स्मृतिप्रीत्यर्थ तारखा कळवून आपण पृष्ठदान करू शकाल. गेल्या वर्षीच्या डायरीत पृष्ठदान केलेले असेल त्यांनी यंदाही पुन्हा करण्यास काहीच हरकत नाही. लवकरात लवकर आपण पृष्ठदानाच्या तारखा कळवल्या म्हणजे त्याच दिवशीच्या पानावर घालता येतील. आपण तारखा कळवल्यानंतर रिकामी असेल तर त्या तारखेला नाहीतर त्याच्या जवळपास जी तारीख रिकामी असेल तेथे आपली खरी तारीख कंसात देऊन नाव, फोन, व्यवसाय/नोकरी - पद व वैशिष्ट्य छापले ााईल. **याशिवाय आपल्या इच्छेनुसार आपण आपला ई-मेल कळविल्यास त्याचाही छापावयाच्या माहितीत समावेश करता येईल** तरी आपली माहिती कळवून जास्तीत जास्त पृष्ठदानासाठी नोंदणी करावी.

डायरीमध्ये जाहिरात छापण्यासाठीचे सुधारित दर इच्छुक जाहिरातदारांना फोनवर कळविण्यात येतील. गतवर्षीच्या डायरीचे दर संदर्भासाठी खाली दिले आहेत.*(१.डायरीचे मलपृष्ठ रंगीत ७००० रु.; २.डायरीचे मुखपृष्ठ व मलपृष्ठाचे आतील पान रंगीत ५००० रु.; ३.रंगीत पूर्ण पान ३५०० रु.; ४.काळे पांढरे पूर्ण पान ३००० रु.; ५. काळे पांढरे अर्धे पान १५०० रु.; ६.काळे पांढरे पाव पान ५०० रु.; ७.शुभेच्छा पट्टी ३०० रु.; ८.पृष्ठदान १०० रु.)*

बाहेरगांवच्या लोकांनी पृष्ठदान किंवा जाहिरातीचे पैसे पाठवताना शक्यतो ड्राफ्ट किंवा मनिऑर्डरने पाठवावे. चेकने बँकेत कमीशन खूप कापले जाते असा अनुभव आहे. मनिऑर्डरने पैसे पाठवल्यास आमच्याकडे जो भाग राहतो त्यावरही आपले पूर्ण नाव, पत्ता, रक्कम व तपशील लिहावा म्हणजे नोंदणी करणे सुलभ होते.

नीलांबरी रमेश मराठे पुणे. फोन- ०२०-२४४५६२७०

डायरीच्या सुरुवातीच्या पानांतल्या माहितीत कोणत्या विषयांचा समावेश असावा, त्या विषयाची माहिती कोणाकडे मिळेल याबद्दल आपले विचार आणि आपल्या अन्य काही सूचना कळवाव्या.

गेल्या वर्षी वेळेअभावी सर्व कुलबांधवांशी आम्ही संपर्क साधू शकलो नाही. यावर्षी जास्तीत जास्त कुलबांधवांना डायरीमध्ये सहभागी होता यावे म्हणून हे निवेदन लवकर देत आहोत. तरी **आपण १५ सप्टेंबर२००७ पर्यंत** पृष्ठदान, जाहिराती व आवश्यक माहिती पाठवावी म्हणजे छपाईसाठी पुरेसा वेळ मिळू शकेल.

**सौ. नीलांबरी रमेश मराठे**
व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र,६४२, नारायण पेठ, प्राथमिक नूमवि समोर,अप्पा बळवंत चौक, पुणे ४११ ०३०.फोन : २४४५६२७०

**संपर्क व पत्रव्यवहारासाठी अन्य पत्ते**

२. **श्री. अरुण दत्तात्रय मराठे**
१७५९ सदाशिव पेठ, भिकारदास मारुती जवळ, पुणे ४११ ०३०.फोन : २४४७३२८१

३. **श्री. श्रीनिवास गोपाळ मराठे**
त्रिवेणी नं. १, डेक्कन पाटबंधारे सोसायटी, एस.एन.डी.टी. कॉलेज समोर, एरंडवणे, सर्व्हे नं. ३६/९, पुणे - ४११ ०३८
फोन-२५४६४७०६; मो.: ९८२२७७७३६१

-o-

## हितगुजच्या प्रारंभिक वेब पत्रिकेच्या निमित्ताने

हितगुज या आपल्या त्रैमासिक नियत कालिकाच्या माध्यमातून उण्यापुऱ्या २५ वर्षांच्या कालावधीपर्यंत कुलबांधवांशी सतत व नियमित संपर्क साधण्याच्या आमच्या प्रयत्नाना आपल्या सक्रिय सहकार्यामुळे जे यश प्राप्त झाले आहे त्यामुळे आम्हाला नवनवीन उपक्रम सुरू करण्यासाठी प्रेरणा व पाठबळ मिळत आहे. सदस्य वाचकांच्या भेटीला येण्याचा कालावधी त्रैमासिकावरुन मासिकावर आणण्याचा विचार आमच्या मनात असूनही व्यावहारिक व आर्थिक अडचणींमुळे तो तूर्तास तरी अशक्यप्राय मानावा लागत आहे.

मात्र माहिती-तंत्रज्ञानाच्या आधुनिक विस्तारामुळे व आज ना उद्या "इंटरनेट घरोघरी" दाखल होणार आहेच या शक्यतेचा विचार करून त्रैमासिक हितगुजला पूरक जोड म्हणून **१ ऑक्टोबर पासून मासिक वेब पत्रिका** सुरू करीत आहोत. आपल्या वेबसाईटला भेट देऊन संपर्क साधू शकणाऱ्या सर्व कुलबांधवांपर्यंत दर महिन्याच्या १ तारखेस पोहोचण्याचा आमचा हा विचार आपल्या पसंतीस उतरेल असा भरंवसा वाटतो. आपल्या प्रतिक्रिया /सूचना हा अंक मिळताच (किंवा साईटवर दिसताच ) आम्हाला कळविल्यास त्यांचा समावेश या प्रारंभिक अंकात करता येईल.

अर्थातच त्रैमासिक हितगुजसुद्धा यापूर्वीच्या अंक ६८, ६९ व ७० प्रमाणेच वेबसाईटच्या **मुखपत्र** या सदरावर ठेवला जाणार आहेव. व या मासिक बेब पत्रिकेत आलेला सर्व मजकूर मुद्रित हितगुज त्रैमासिकामध्ये पुनर्मुद्रित केला जाईलच. -**संपादिका.**

-o-

**(पुढील मजकूर पृ. ११ वर)**

**(प्रतिष्ठानवृत्त-वा.स.सभा पृ. २ वरून)**

या सभेत दि. २९ ऑक्टोबर २००६ च्या २४ व्या वार्षिक सभेचे इतिवृत्त व हिशेब पत्रके मंजूर झाल्यानंतर हितगुजच्या स्वरूपाविषयी सह-संपादक श्री. सी. गो. खांबेटे, वि.के. मराठे व ल.शं. मराठे यांनी आपले विचार व्यक्त केले. निवृत्त पोस्ट कर्मचारी व युनियनचे अध्यक्ष श्री. दिनकर रामचंद्र मराठे यांनी आपल्या प्रदीर्घ भाषणात प्रतिष्ठानच्या कार्याला उपयुक्त असे मोलाचे मार्गदर्शनपर विचार व्यक्त केले.

याच सभेत २००७-०८ ते २००९-१० या तीन वर्षांसाठी खालील प्रमाणे नवीन कार्यकारिणीची निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. आनंद यशवंत मराठे | ठाणे-प. |
| २. | श्री. रमाकांत माधव विद्वांस | माहीम, |
| ३. | श्री. मोहन सदाशिव मराठे | खार-प. |
| ४. | श्री. हेमंत अरुण मराठे | नालासोपारा. |
| ५. | श्री. प्रभाकर दामोदर मराठे | वडाळा |
| ६. | श्री. विनायक केशव मराठे | वरळी |
| ७. | श्री. लक्ष्मण शंकर मराठे | मुलुंड |
| ८. | श्री. सीताराम गोपाळ खांबेटे | अंधेरी |
| ९. | श्री. प्रमोद कृष्ण मराठे | ठाणे-प. |
| १०. | श्री. चिंतामण महादेव मराठे | परळ |
| ११. | सौ. सुमेधा प्रभाकर मराठे | वडाळा |
| १२. | श्री. वामन गणेश मराठे | जोगेश्वरी |
| १३. | श्री. सुरेश गोाविंद मराठे | डोंबिवली |
| १४. | श्री. शरद अरुण मराठे | खार |
| १५. | सौ. शरद मराठे | खार |
| १६. | श्री.अरुण दत्तात्रय मराठे | पुणे |

# ‘बेस्ट’ मधील ‘श्री.ना.’

-गजानन भास्कर मराठे (पृ.४२७) घाटकोपर-पू. मुंबई ४०००७२ दूरध्वनी:

बेस्ट उपक्रमात श्री.ना.पेंडसे यांनी जवळ जवळ तीस वर्षे नोकरी केली, पण त्यांना साहित्यिक पुरस्कार मिळेपर्यंत फार थोड्या लोकांना ते बेस्टमध्ये आहेत हे माहिती होते. ते पदवीधर असून कारकून म्हणून नोकरीस लागले. त्यांनी बढती करिता प्रयत्न केले नाहीत. ते म्हणत, ‘मला लिखाणाकरिता मनःस्वास्थ्य पाहिजे. व निव्वळ लिखाणावर - निदान सुरुवातीच्या काळात संसार चालविणे कठीण..’. स्थिर नोकरी असावी म्हणून ते बेस्टमध्ये लागले. समयपालन विभागात ते पगारपत्रके बनवीत. प्रामुख्याने ते दादर ऑफिसमध्ये होते. १९६३ साली त्यांना रॉकफेलर फौंडेशनचा पुरस्कार मिळाल्यावर ते बेस्टमध्ये आहेत हे जगजाहीर झाले. त्यावेळचे बेस्टचे मॅनेजर डॉ.घाटे (आय ए एस) यांनी त्यांना बोलावून घेतले व सांगितले की, एवढा मोठा लेखक बेस्ट मध्ये कारकून आहे, हे संस्थेस कमीपणाचे आहे. त्यांनी बेस्ट समितीशी विचार विनिमय करून त्यांना कारकून या पदावरून ‘क्लास वन ऑफिसर (अ श्रेणी)’ या पदावर बढती देण्याचा प्रस्ताव समितीपुढे आणला. पण काही अधिकाऱ्यांनी ज्येष्ठता वगैरे मुद्दे उपस्थित केले. शेवटी ॲडव्होकेट जनरलचे मत घेऊन असे ठरले की, उपरोक्त उच्च पद फक्त त्यांना वैयक्तिक म्हणून द्यावे व त्यांच्या नोकरी समाप्तीच्या वेळी ते रद्द करण्यात यावे. जनता संपर्क अधिकरी हे पद व बढती त्यांना देण्यातआली. बेस्ट समितीचे त्यावेळचे अध्यक्ष श्री. महाडेश्वर यांच्या अध्यक्षतेखाली बेस्ट एम्प्लॉइज असोशिएशन आचार्य अत्रे यांच्या हस्ते श्री.पेंडसे यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी अत्रे गंमतीत म्हणाले की, पेंडसे हे मराठीतील ‘पहाडेश्वर’ आहेत. बेस्टमध्ये मराठीचा वापर सुरू करावा अशी जोरदार मागणी होती. पेंडसेंच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभाग सुरू करण्यात आला. बेस्ट समितीची कार्यक्रम पत्रिका इंग्रजीमधून मराठीत करण्यास, समितीचे ठराव, निरनिराळी पत्रके, मराठी प्रेस नोट,आदि उपक्रम सुरू करण्यात आले. भाषांतराबद्दल त्यांची दृष्टी अशी होती की, भाषांतर क्लिष्ट असता कामा नये. सिमेंटला वज्रचूर्ण न म्हणता सिमेंटच म्हणावे. महापालिकेत सेक्रेटरीला चिटणीस म्हणतात. पण पेंडशांनी बेस्टमध्ये सचिव हा शब्द रूढ केला कारण चिटणीस हा शब्द फारसी आहे. तसेच इंडेम्निटी बॉन्डला इच्छाबंधनदर्शक असे न म्हणता इंडेम्निटी बॉण्ड असेच मराठीत लिहावे. ही काही उदाहरणे. त्यांचे ‘संभूसाच्या चाळीत’ हे नाटक प्रथमतः बेस्ट कला क्रीडा विभागाने नाट्यस्पर्धेत आणले. त्यांतर बेस्टमधील कलावंतांनी त्याचे धंदेवाईक स्वरूपात शेकडो प्रयोग केले. पेंडसे गंमतीत म्हणत की चाळीवर नाटक लिहून त्यांनी ब्लॉक घेतला. ते दादरच्या डोंगरे बागेतील चाळीतून माहिमला मोठ्या ब्लॉकमध्ये राहायला गेले. त्यांनी बेस्टच्या पार्श्वभूमीवर ‘रामशरणची गोष्ट’ ही कथा लिहिली आहे. त्यात बेस्टमधील युनियन-कामगार संबंध इत्यादी गोष्टींवर प्रकाश टाकला. बेस्टच्या महापालिकाकरणाला १९७२ साली २५वर्षे झाली म्हणून मोठा रौप्य महोत्सवी सोहळा झाला.त्या आधी १९६८ मध्ये पेंडसे सेवानिवृत्त झाले होते. बेस्ट उपक्रमाची कथा या पुस्तकाचे त्यावेळी प्रकाशन झाले. हे पुस्तक श्री.पेंडसे यांनी खूप मेहनत घेऊन लिहिले. हे पुस्तक अतिशय माहितीपूर्ण व रंजक आहे. पेंडशांनी रुक्ष माहितीला साहित्यिक मुलामा दिला.१९९७ साली महापालिकाकरणाला ५०वर्षे झाली तेव्हा या पुस्तकाची अधिक माहिती देणारी प्रत काढण्यात आली. ते कामसुद्धा पेंडशांनी उतारवय असूनही केले. श्री. पेंडसे यांना विविध खात्यांची माहिती देण्याकरिता एक अधिकाऱ्यांची समिती नेमली होती. त्याचा मी सदस्य होतो. त्या निमित्ताने पेंडस यांच्याशी संपर्काचा योग आला. १९६८साली त्यावेळचे बेस्टचे जनरल मॅनेजर यांनी पेंडशांच्या कामाबद्दल काही शंका प्रदर्शित केल्या. त्याचा निषेध म्हणून श्री. पेंडसे यांनी सेवानिवृत्तीपूर्वी एक वर्ष आधीच स्वेच्छा निवृत्त घेतली.त्यांच्या स्मृतीस आदरांजली.(लेखक बेस्ट उपक्रमाचे माजी सचिव आहेत)

-०-

# नवीन उपक्रमांसाठी आवाहन

-सी.गो.खांबेटे, सहसंपादक.

### १.हितगुजची हेल्पलाईन

आपल्या परिवारात अनेक व्यक्ती अशा आहेत की ज्या काही विशेष सेवा, मार्गदर्शन, सल्ला देऊ शकतात. उदा. वैद्यकीय क्षेत्रातले तज्ञ, थेरपिस्ट, वकील, समुपदेशक, लेखापरीक्षक, इन्व्हेस्टमेंट एजंट, वास्तूविशारद इ. आपल्यापैकी प्रत्येकाला कधी ना कधी अशा सेवा सुविधांची गरज लागते. बऱ्याच वेळा असे होते की आपल्याला हवी असलेली नेमकी मदत कुठे मिळेल हे माहित नसते. हितगुज ही माहिती देणारा दुवा बनू शकतो. काही व्यक्ती खूप वेगळ्या प्रकारचे कार्य करत असतात. पण बऱ्याच जणाना असे काही काम अस्तित्वात आहे हे सुध्दा माहित नसते. अशा सर्व व्यक्तींनी हितगुजकडे आपण देत असलेल्या सेवेची माहिती पाठवावी किंवा हव्या असलेल्या सेवेविषयीच्या माहितीसंबंधी **“कुठे ? कुणाकडे ?”** अशी पत्राने विचारणा करावी. त्यातून **“ हितगुजची हेल्पलाईन ”** अथवा **“परस्पर सहाय्य योजना”** तयार होईल. किंबहुना आपल्या प्रतिष्ठानच्या ध्येय धोरणांपैकीचे ते एक महत्त्वाचे अंग आहे. यामुळे तुमच्या कामाची माहिती परिवारातील सर्वांपर्यंत पोहोचेल व हितगुज खऱ्या अर्थाने संपर्क माध्यम बनेल. परिवारातील व्यक्तींसाठी खास सवलत देऊ इच्छिणाऱ्या सेवा-दात्यांनी आमचेकडे प्रस्ताव पाठविल्यास त्याना हितगुजच्या माध्यमातुन प्रसिद्धी दिली जाईल.

### २. मराठे परिवार कट्टा

हितगुजतर्फे स्थानिक पातळीवर नियमितपणे काही छोटे छोटे कार्यक्रम आखावेत. जसा एखादा संवाद गट असतो. ज्यात सहभागींना स्वतःला व्यक्त व्हायला (अत्रे कट्ट्याप्रमाणे), बोलायला संधी मिळेल, ज्यामुळे लोक अंकात अधिक रस घेऊ लागतील; लोकांचा एकमेकांशी परिचय व संवाद होईल. असा एखादा उपक्रम सुरु करण्याचा मानस आहे. अन्यथा वार्षिक मेळाव्याखेरीज लोक एकमेकांना भेटतच नाहीत. मेळाव्याला येणे प्रत्येकाला शक्य होतेच असे नाही. त्या दृष्टीने हा उपक्रम उपयोगी ठरेल. यातून नवीन कार्यकर्तेही तयार होतील. याबाबत वाचकांनी त्यांच्या कल्पना हितगुजकडे पाठवाव्यात.

यासाठी कृतिशील वाचक-सदस्यांनी आपल्या ideas पाठवाव्यात. जर कुणाचे घर मोठे असेल तर तिथेही असा कार्यक्रम आपण घेऊ शकतो. हॉल वगैरे घेण्याची काही गरज नाही. अशा एखाद्या स्थानिक उपक्रमाला प्रतिष्ठानचे केवळ उत्तेजन व प्रसिद्धीच नव्हे तर सक्रिय मार्गदर्शन व सहाय्यही मिळू शकेल.

-०-

# माझे संचित

सदानंद विष्णू (भाऊ) मराठे (पृ.५०७) नीलमणी, राऊत रोड, शिवाजी पार्क दादर-प., मुंबई ४०००२८

*(सुप्रसिद्ध निवेदक सदानंद विष्णू उर्फ भाऊ मराठे यांनी यापुढे हितगुजमध्ये माझे संचित या नावाने नवीन सदर सुरू करुन नियमितपणे लेखन पाठविण्याचे मान्य केले आहे. याविषयीच्या पत्रात ते लिहितात, "गेली १२ वर्षे मी विविध कार्यक्रमांचे निवेदन, सूत्रसंचालन करीत आहे. त्यानिमित्त झालेला अभ्यास, विविध ठिकाणी आलेले अनुभव, भेटलेली माणसे या संदर्भात हितगुज मधून माझे संचित हे सदर लिहायचा विचार आहे सोबत एक कविता पाठवित आहे." या सदराच्या निमित्ताने हितगुज-वाचक सदस्याना एका चोखंदळपणे संग्रहित केलेल्या वाग्धनाचा लाभ होणार आहे. यातील प्रारंभिक संचिताची खालील निवड आपल्याला 'रोचक' वाटावी अशीच आहे -संपादिका)*

काय वाढले पानावरती,
ऐकुन घ्यावा थाट संप्रती
धवल लवण हे पुढे वाढले,
मेतकूट मग पिवळे सजले
आले लोणचे बहु मुरलेले,
लिंबू कागदी रसरसलेले.
किसुन आवळे मधुर केले,
कृष्णाकांठचे वांगे आणिले
खमंग त्याचे भरितचि केले,
निरनिराळे चटके नटले
चटण्यांचे बहु नवे मासले,
संमेलनची त्यांचे भरले
मिरची खोबरे तीसह ओले,
तीळ भाजुनी त्यात वाटले
कवठ गुळाचे मीलन झाले,
पंचामृत त्या जवळी आले
वास तयांचे हवेत भरले,
अंतरी अण्णा अधिर जाहले
भिजल्या डाळी नंतर आल्या,
काही वाटल्या काही मोकळ्या
काही वाटुन सुरेख तळल्या,
कोशिंबिरीच्या ओळी जमल्या
शुभ्र काकड्या होत्या किसल्या,
चिरुन पेरुच्या फोडी सजल्या
एकरुप त्या दह्यात झाल्या,
भाज्या आल्या अळु घोसाळी
रानकारली वांगी काळी,
चुका चाकवत मेथी कवळी
चंदनबटवा भेंडी कोवळी,
फणस कोवळा हिरवी केळी
काजूगरांची गोडी निराळी,
दुधी भोपळा आणि रताळी
किती प्रकारे वेगवेगळी,
फेण्या पापड्या आणि सांडगे
कुणी आणुनी वाढी वेगे,
गव्हल्या नखुल्या धवल मालत्या
खिरी तयांच्या शोभत होत्या,
शेवयांच्या खिरी वाटल्या
आमट्यांनी मग वाट्या भरल्या,
सार गोडसे रातंब्याचे
भरले प्याले मधुर कढीचे,
कणीदार बहु तूप सुगंधी
भात वाढण्या थोडा अवधी.......

(ग. दि. माडगूळकर-१९४५ सालची कविता)

## मराठे प्रतिष्ठान

सार्वजनिक विश्वस्त नोंदणी क्र .७९१८(मुं.)दि.१२.१.८१
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५.)
e mail: maratheparivar@yahoo.co.in
वेबसाईट-
www.marathepratishthan.org

**आजीव सभासद व हितगुज तहहयात वर्गणीदार होण्यासाठी करावयाचा अर्ज (नमुना)**

मराठे प्रतिष्ठानची घटना व नियमांनुसार मी मराठे प्रतिष्ठानचा आजीव सदस्य व हितगुज या त्रैमासिक मुखपत्रासाठी तहहयात सदस्य होऊ इच्छित आहे.

आजीव सदस्य वर्गणी रु. १०० व हितगुजची तहहयात वर्गणी रु. २०० मिळून एकूण रु. ३०० सोबत रोख / मनीऑर्डरने/ मुंबईतील बँकेवर काढलेल्या डिमांड ड्राफ्टने /चेकने पाठवीत आहे.

ड्राफ्ट/चेक क्रमांक दिनांक
बँकेचे व शाखेचे नावः
सही
संपूर्ण नांवः
जन्मतारीख
पत्ताः
पिनकोड
टेलिफोन/सेल
ई-मेलः
व्यवसाय/नोकरी पूर्ण तपशीलासह
कार्यालयीन पत्ताः
कार्यालयीन टेलिफोन व इ-मेल

(वि.सू.- विवाहित सासुरवाशिणींनी पतीचे संपूर्ण नाव व पत्ता, तसेच माहेवाशिणींनी पित्याचे संपूर्ण नाव व पत्ता कळवावा.)

### वार्षिक वा अन्य सभा-समारंभांना

## सदस्यांच्या उपस्थितीसाठी आवाहन

सालाबादप्रमाणे वार्षिक सर्व साधारण सभा दि. २२-७-२००७ रोजी संपन्न झाली. या सभेला दरवर्षीप्रमाणेच अत्यल्प उपस्थिती होती हा चिंतेचा विषय आहे.

उपस्थित सभासदांमधील एक सभासद बोलून गेले की आपले आजीव सभासद १००० चेवर आहेत. शिवाय प्रत्येक कुटुंबातील सदस्य वेगळे . असे असूनही सभेला ५०सदस्य सुद्धा जमा होऊ नयेत असे का ? एवढी अनास्था का ?

मला आपणा सर्वांना एक सांगायचे आहे की आपल्या प्रतिष्ठानमध्ये प्रत्येक सभासद म्हणजे स्त्री, पुरूष मुले, सर्वांनी भाग घ्यावयाचा आहे. आपणास असे वाटते का कीवा.स.स. म्हणजे रटाळ आकडेवारी व देणग्या मागणा री भाषणे एवढेच असते ? मात्र आपण हे समजून ग्या की मराठे प्रतिष्ठअन हे एक कुटुंब आहे. हे प्रतिष्ठअन संपूर्ण कुटुंबा साठी आहे.यामध्ये येणारा पैसा आपल्या सर्वांचा आहे. व जाणारा पैसासुद्धा आपल्यापैकीच कोणअतरी अदचणीत असणाऱ्या नातलगाला जायचा आहे. जेव्हा शक्य होते, परिस्थिती बदलते, तेंव्हा त्यांचेकडून हा पैसा परत येतो व दुसऱ्या गरजू नातलगाना जातो. म्हणजेच हा कुटुंबातील व्यवहार आहे हे आपण सर्वांनी समजूनघेतले पोाहिजे. याला प्रत्येकाने हातभार लावला पाहिजे. आणि हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे. आपण देणगी किति दिली यापेक्षा कर्तव्य समजून दिली याला महत्त्व आहे. तसेच मराठे प्रतिष्ठानच्या कार्याला योग्य वेळी आपला स्वतःचा वेळ देणे हे सुद्धा तितकेच अगत्याचे आहे.

तंव्हा आपणा सर्व लहानथोराना माझे आग्रहाचे सांगणे आहे कि प्रतिष्ठअनचा कोणताही कार्यक्रम असो, संस्कृति असो अगर फक्त सभा असो, घरातील शक्य तितक्या लोकांनी हजेरी लावावी. मग बघा आपणांस ऐकमएकांना भेटल्यावर कसा आनंद मिळतो.

याबद्दल कोणाला काही सांगायचे असेल तर ते सदस्य संवाद या सदरासाठी पत्र पाठवून कळवावे. म्हणजे आपले म्हणणे सर्वांपर्यंत पोहोचविता येईल.

## तहान

***प्रेषिका-अस्मिता वेलणकर(पृ.६७६),डोंबिवली***

(इंटरनेटवरून साभार,)

सुखामागे धावता धावता
विवेक पडतो गहाण
पाण्यात राहूनही माशाची मग
भागत नाही तहान
स्वप्ने सत्यात आणता आणता
दमछाक होते खूप
वाटी वाटीने ओतलं तरी
कमीच पडतं तूप
बायका आणि पोरांसाठी
चाले म्हणे हा खे ळ
पैसा आणून ओतेन म्हणतो
पण मागू नका वेळ
CAREER. होतं जीवन
मात्र जगायचं जमेना तंत्र
बापाची ओळख मुलं सांगती
पैसा छापणारं यंत्र
चुकून सुट्टी घेतलीच तरी
पाहुणा स्वतःच्याच घरी
दोन दिवस कौतुक होतं
नंतर डोकेदुखी सारी.
मुलंच मग विचारू लागतात,
बाबा अजून का हो घरी ?
त्यांचाही दोष नसतो
त्यांना सवयच नसते मुळी
क्षणिक औदासीन्य येतं मात्र
पुन्हा सुरू होतं चक्र
सोनेरी वेली वाढत जातात
घराभोवती चढलेल्या
असून मात्र मातीच्या
भिंती कधीही न सारवलेल्या.
आयुष्याच्या संध्याकाळी मग
एकदम जाणवू लागतं काही
धावण्याच्या हट्टापायी
श्वासच मुळी घेतला नाही
सगळं काही पाहता पाहता
आरशात पाहणं राहून गेलं
सुखाची तहान भागता भागता
समाधान दूर वाहून गेलं.

-०-

## कै.चिंतामण बळवंत स्मृतीदिनाप्रित्यर्थ
## निबंध स्पर्धा २००८

श्री. गजानन बळवंत मराठे, प्लॉट नं. ३४ अ, सार्थक, सेनादत्त कॉलनी, पुणे ४११ ०३० (फोन-२४५३१६५९) यांनी त्यांचे तीर्थरूप कै. चिंतामण बळवंत यांच्या १३-७-९४ या स्मृतीदिना प्रीत्यर्थ गतवर्षी हस्ताक्षर स्पर्धा आयोजिली होती. त्याचप्रमाणे ह्या वर्षी त्यांनी विविध वयोगटांसाठी निबंध स्पर्धा जाहीर केली आहे. स्पर्धेची माहिती, नियम इ. खालीलप्रमाणे आहेत.

१. **पात्रता**- मराठे प्रतिष्ठानची कोणतीही व्यक्ती किंवा मराठ्यांची माहेवाशीण व तिचा परिवार.

२. **पुढील चार गटात विभागणी**: (१) शालेय गट (२) युवा गट (कॉलेज गट) (३) मध्यम गट- वय २१ ते ५९ व (४) प्रौढ गट-(ज्येष्ठ नागरिक) वय ६० पासून.

३. **बक्षिसे** - प्रत्येक गटास ३ बक्षिसे-अनुक्रमे रु. २५०, १५० व १००.

४. **निबंधाची शब्द मर्यादा** - ७५०शब्द (अंदाजे फुल स्केप पेपर ची दोन पाने.)

५. **महत्त्वाची सूचना** - प्रत्येक स्पर्धकाने आपला निबंध काळ्या शाईत पेनने किंवा बॉलपेनने लिहावयाचा आहे. अन्य रंगाच्या शाईतील लिखाणाचा विचार केला जाणार नाही.

६. **आपला गट क्रमांक व जन्मतारीख** प्रत्येक स्पर्धकाने लिहिणे बंधनकारक आहे.

७. **स्पर्धेची अंतिम तारीख** २८-१-२००८ आहे.
**स्पर्धेचा निकाल** फेब्रुवारी २००८मध्ये जाहीर केला जाईल. मार्च २००८मध्ये संबंधितांना बक्षिसे पाठविली जातील व निकाल हितगुजच्या मार्च २००८ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

८. **स्पर्धेच्या निबंधांचे विषय** पुढीलप्रमाणे आहेत.

(१)शालेय गटः १.शाळेचा पहिला दिवस. २. माझा महाराष्ट्र. ३. माझे छंद.

(२)युवा गटः १. माझ्या कॉलेजचा पहिला दिवस. २. माझा आवडता खेळ. ३. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद-माहिती व आवश्यकता.

(३)मध्यम गटः १. आमच्या लग्नाची गोष्ट.२.आमचा प्रेमविवाह ३. महागाई-एक समस्या.

(४)प्रौढ गटः १. माझा परिवार. २. वृद्धांच्या समस्या व उपाय योजना. ३.मराठी चित्रपट ,नाटके- काल आज व उद्या. ४. मोबाईल- गरज की फॅड ?

९. स्पर्धेत आलेले निबंध तज्ज्ञ लेखक-परीक्षकांकडून तपासले जातील.

१० निबंध पुढील पत्यावर पाठवावे.- **श्री. गजानन मराठे,प्लॉट नं. ३४ अ, सार्थक, सेनादत्त कॉलनी, पुणे ४११ ०३०**

-०-


*पणजोबा प्रभाकर शिवराम मराठे*
*यांच्या स्मरणार्थ*

***प्रभाकर दामोदर मराठे***
*वडाळा , मुंबई ४०००३१*
**सेलः ९८२० २३२ ०८२ दूरध्वनी : २ ४१५ ०८८९**
**ई-मेलः prabhakar_marathe@yahoo.com**



# उत्सव स्वातंत्र्याचा

-सुनीती मराठे, माटुंगा मुंबई ४०००१४ .
दूरध्वनी २४१४१८७६

भारतीय स्वातंत्र्याच्या हीरक महोत्सवानिमित्त महाराष्ट्र टाईम्स द्वारा आयोजित निबंध स्पर्धेमध्ये ज्येष्ठ गटात प्रथम क्रमांकाचा व म.टा.च्या दि.१५-८-२००७ च्या मुंबई आवृत्तीमध्ये प्रसिद्ध झालेला हा निबंध ज्येष्ठ वाचक-सदस्यांच्या स्मृतींना उजळा देईल.श्रीमती सुनीती मराठे याना समाजसेवेची आवड असून दादर भगिनी समाज व श्रद्धानंद महिलाश्रम या संस्थामध्ये अनेक वर्षे सक्रिय सदस्य आहेत .त्यांचा 'वाल्या कोळ्याची बायको' हा कथासंग्रह व 'माळ्यावरची अडगळ'हा ललित लेखसंग्रह प्रकाशित झाला असून ललना मासिकात सध्या प्रसिद्ध होत असलेली त्यांची प्रवासवर्णन मालिका पुस्तकरूपाने प्रकाशित होण्याच्या मार्गावर आहे. शिवाय अनेक मासिकांतून त्यांचे लेखन प्रसिद्ध झाले असून विविध स्त्रीसंस्था व मासिकांच्या लेखनस्पर्धांतून त्यानी बक्षिसे, ढाल व पुरस्कार प्राप्त केले आहेत. प्रस्तुत बक्षिस प्राप्त निबंधासाठी श्रीमती सुनीती मराठे यांचे प्रतिष्ठानतर्फे खास अभिनंदन.-

आठवणीतल्या प्रथम स्वातंत्र्यदिनाविषयीचे ा अनुभव पुढील हितगुजसाठी **ज्येष्ठ सदस्यांनी १५ नोव्हेंबर २००७ पर्यंत** पाठवावेत. शब्दमर्यादा २५०.संपादिका )

तेव्हा आम्ही मुंबईत रहात होतो. मी होते फक्त आठ वर्षांची. स्वातंत्र्य म्हणजे काय, गुलामगिरी म्हणजे काय, ते काही कळत नव्हते. मी बालमोहन शाळेत चौथीत शिकत होते. स्वातंत्र्य दिनाला सर्वांच्या उत्साहाला उधाण आले होते. तेव्हा आमची शाळा, लाल विटांची बैठी इमारत होती. फुला पानांच्या माळा, तोरणे, कागदाच्या पताका लावून शाळा छान सजवली होती. दिव्यांच्या माळा लावून रोषणाई केली होती.

छान रंगीत रांगोळ्या काढल्या होत्या. वर्गा वर्गातून सगळी साफ सफाई, सुंदर सजावट, मुलांकडून करून घेतली होती. त्या दिवशी सकाळी सात वाजताच आम्ही छान नवे कपडे घालून, शाळेत हजर झालो होतो. त्या काळात आम्हाला रोज सुद्धा युनिफॉर्म नव्हताच. साडेसात वाजता सर्व मुले शाळेच्या चौकात शिस्तीत वर्गाप्रमाणे रांगा करून, उभे राहिलो. दादासाहेब रेगे शाळेचे मुख्याध्यापक होते. त्यांनी मुलांना समजेल अशा शब्दात छोटेसे भाषण केले. मग उंच ध्वज दंडावरचा भारताचा तिरंगा, त्यांनी दोरी ओढताच डौलात फडकू लागला. सर्वांनी उत्साहाने राष्ट्रगीत म्हटले व जयहिंद, जयभारत, भारतमाता की जय अशा घोषणा दिल्या. आम्हाला छोटे तिरंगी ध्वज आणि खाऊचे सुका मेव्याचे पाकीट दिले. या साठी सरकार तर्फे मुलांच्या खाऊसाठी, प्रत्येकी सहा आणे मंजूर झाले होते. मग सर्व शाळेतल्या मुलांची शिवाजी पार्क भोवतीच्या रस्त्यावरून प्रभात फेरी काढण्यात आली. मोठ्या मुलांनी देशभक्तीपर गाणी म्हटली, शाळेच्या वाद्यवृंदाच्या साथीवर. आम्ही लहान मुले मागोमाग म्हणत होतो. या प्रभात फेरीत चालताना आपण केवढी देशभक्ती करतोय, असा आम्हाला अभिमान वाटत होता. शाळेत परत आल्यावर थोडे खेळलो, मागच्या बाजूला सर्वांसाठी जेवण तयार होत होते. मोठी मुले कामात थोडी मदत करत होती. मग अंगणात पंक्ती मांडल्या. आम्ही पण त्यात लुडबूड करत होतो. केळीची पाने व द्रोण यावर जेवण होते. सर्वांबरोबर असे अंगत पंगत जेवायला खूप मजा आली. जेवताना अधे मध्ये मोठ्या मुलांनी श्लोक म्हटले. आमचे मुलांचे दादा स्वतः पंगतीत फिरून सर्वांना आग्रह करत होते. पण पानात काही टाकायचे नाही हं असेही सांगत होते. घरात नाना खोड्या असणारी मुले, सर्व पान साफ करत होती. आज सगळेच जण उत्साहात होते. घराघरावर तिरंगा फडकत होता. तोरणे लावली होती. फोर्ट विभागात तर सगळ्या सरकारी व सार्वजनिक इमारतींवर रोषणाई केली होती; ती पहाण्यासाठी आमच्या बिल्डिंगमधल्या सर्वांनी मिळून एक उघडी ट्रक ठरवली होती. जेवणे खाणे आटपून बिल्डिंगमधले सगळे आबाल वृद्ध उत्साहाने निघाले. वाटेत असे पुष्कळ ट्रक होते. मोटारी, बसेस होत्या. खूप माणसे चालत होती. आम्ही गाणी गात, घोषणा देत जात होतो. एवढी माणसे आजपर्यंत मीकधीच एकदम पाहिली नव्हती. व्ही.टी.स्टेशन (आजचे छत्रपती शिवाजी टर्मिनस,महापालिकेची इमारत, युनिव्हर्सिटी,राजाबाई टॉवर, फ्लोरा फाऊंटन, म्युझियम, हायकोर्ट, टाऊन हॉल, पूर्वीचे सचिवालय, मेट्रो थिएटर या सगळ्या इमारती रोषणाईने उजळून निघाल्या होत्या. अर्थात ही एवढी सगळी नावे नंतर मला कळली. दिव्यांच्या झगमगत्या माळा त्या सुंदर इमारतींवर कलात्मकतेने सोडल्या होत्या. ब्रिटीशांनी अतिशय कलात्मक पद्धतीने बांधलेल्या डौलदार वास्तू, डोळ्यांचे पारणे फेडत होत्या. आम्ही लहान मुलांच्या गोष्टीत वारंवार येणारा स्वर्ग, स्वर्ग म्हणतात तो हाच असेल असे मला वाटत होते. त्या काळात मी तर लहानच होते; पण मोठ्या माणसांनी सुद्धा असे अपूर्व दृश्य, इतकी सुंदर रोषणाई कधी पाहिली नव्हती. आकाशातली नक्षत्रे तोडून आणून त्याच्या तर माळा केल्या नसतील, असे वाटत होते. आता हल्ली काय प्रत्येक लग्न कार्यात, गणपती उत्सवात सुद्धा इतकी रोषणाई असते की, कशाचीच काही नवलाई वाटत नाही. त्या पहिल्या वहिल्या स्वातंत्र्य दिनाची अपूर्वाई काही वेगळीच आहे. तो अविस्मरणीय स्वातंत्र्यदिन, साठ वर्षांनंतर आजही आठवतो. त्या झळाळणाऱ्या रोषणाईच्या, लखलखित आठवणी माझे मन उजळून टाकतात.

-०-

**महत्त्वाची सूचना (१)**

ई-मेलची सोय असलेल्या वाचक-सदस्यानी आपल्या पूर्ण नाव-पत्ता-फोन सह या अंकाची पोहोच द्यावी. तसेच आपल्या परिवारातील सर्व सदस्यांच्या जन्मतारखा व नोकरी-शिक्षणानिमित्त अन्यत्र राहणाऱ्या परिवार सदस्यांचे ई-मेल व फोन नंबर, पत्यासह कळवावे. आता हितगुजचे डिसेंबर २००६ पासूनचे अंक(क्र. ६८पासूनचे)
www.marathepratishthan.org
या वेबसाइटवरसुद्धा उपलब्ध आहेत हे आपल्या परिवारातील व्यक्तीना कळवून आम्हाला इ-मेल करावयास सांगावे. सी.गो. खांबेटे, सहसंपादक.)

**maratheparivar@yahoo.co.in**
OR
**sitaram_khambete@yahoo.com**



# कृतज्ञ मी!
# ...कृतार्थ मी !!

- 'वा.ग.' मराठे, जोगेश्वरी पू. दूरध्वनी-२८२६९४०२

*( "मराठे प्रतिष्ठान" च्या संकल्पनेचे आद्य प्रवर्तक वा.ग. मराठे यांच्या आगामी प्रकाशनाधीन आत्मचरित्राची एक झलक येथे प्रस्तुत केली आहे. गेल्या २५ वर्षात 'वा.गं.' च्या संपर्कात आलेल्या कुलबांधवांनी "मला दिसलेले वा.ग." या शीर्षकाखाली काही मजकूर पाठविल्यास त्याचा समावेश या ग्रंथात परिशिष्ट म्हणून करावयाचा प्रकाशकांचा मानस आहे. इच्छुक कुलबांधवांनी आपले लेखन आमचेकडे पाठवावे. शब्दमर्यादा २५०-सी. गो. खांबेटे, सहसंपादक.)*

## कृतज्ञता सोहळा

आज मी खरोखरच कृतज्ञ आहे. हा सोहळा मी अनुभवतो आहे. हेच माझे मोक्षस्थान आहे. याहून मला मोक्षाची अपेक्षा नाही.

ह्या भूतलावर तुळस नावाच्या खेड्यात माझा जन्म १० डिसेंबर १९४२ साली सूर्योदयानंतर झाला. माझी ती. आजी हिने माझे बारसेच मुळी मुळया, पाने, फुले व अंगारे-धुपारेंचे द्वारा केले. कारण ज्या तान्ह्या मुलाला दूधसुद्धा जात नव्हते अशा मुलाला तिने स्वतःच औषधोपचार करून वाढविले.

माझा लहानपणापासून सूर्यावर अधिक ओढा आहे. सूर्यबिंब, समुद्र-फेसाळणारा, चंद्र व ग्रह, तारे , निळे आकाश, प्रचंड वृक्ष, पर्वत आणि पशु-पक्षी ह्या सर्वांवर माझे अतोनात प्रेम आहे. ह्याचेच पर्यवसान माझ्या ज्ञानावर, शिक्षणावर प्रतिबिंबित झाले आहे. साध्या कावळ्याविषयी माझे मनात फारच जिव्हाळा आहे. लोकांना पोपट आवडतो, पण मला कावळाच जवळचा वाटतो.

सहा वर्षांपूर्वी आमचे वेळी शाळेत घेत नसत, त्यामुळे आमचे शिक्षण गाई-म्हशींच्या गोठ्यातच होत असे. गुरे चारण्यासाठी न्यावयाची व तिथेच आमची आजी निरक्षर असूनही उजळणी, पाढे वगैरे माहिती मुखोद्गत करून घेई.

आम्हाला वैयक्तिक आवड निवड नाही. जवळजवळ तिन्ही वेळा आटवल (मऊभात) मिळे. दुपारी फक्त भात असे. गुळाचा खडा हेच आमचे चॉकलेट. ह्यावरच आम्हाला समाधान मानावे लागे. अजूनही मला गूळ फारच आवडतो- परदेशी चॉकलेटपेक्षाही.

माझ्या विचारांना अजूनही थारा नाही. कारण माझे हात आणि मेंदू बांधूनच ठेवलेला आहे. कारण आमच्या मातोश्री अन् इतर भावंडे! मी फक्त केअर टेकरच. ह्यातून लवकर सुटेन असे मला वाटत नाही. परमेश्वरानेच मला नेमला असल्याने अपील तरी कोणाकडे करणार ? तरीच जन्मा यावे, देह सार्थकी लावावा असेच म्हणावे लागेल.

बालपणातच नको हे जगणे असे वाटत असे. शिक्षणासाठी पैसा नाही. वडिलांचे मार्गदर्शनही नाही. कुटुंबाच्या चरितार्थासाठी भिक्षुकी करावी व शेती करून विद्या घ्यावयाची. माझे मत असे कुणीच मानले नाही. इतर भावंडांना त्यांची जबाबदारी उचलावी असे कधीच वाटले नाही. उभी हयात कोर्ट-कचेरीत घालवून एकेकाळी सुखवस्तू असलेल्या कुटुंबाची आमच्या तीर्थरूपांनी धुळधाणच केली. त्यामुळे परमेश्वरावर श्रद्धा ठेवूनच मी शेवटी मुंबईची वाट धरली. रात्री तीन वाजताच घरातून निघालो. तेव्हा घड्याळही नव्हते. एकटा चालतच निघालो. वाटेत कोल्हे ओरडत. तशी भीती वाटली, पण काय करणार ? आपले घर, देवधर्म, कुळाचार हे सर्व सांगावयास ठीक आहे. पण वास्तवात कठीण आहे. आज मी इथे सर्व अत्रिगोत्री कुटुंब माझे म्हणून पहात आहे. एक दिवस कुळीथ खाऊन रात्र काढावी लागली. सर्व सोने कोर्ट कचेरीच्या दाव्यासाठी खर्च झाले.

इयत्ता आठवीत असताना नेव्हीमध्ये जाण्यासाठी अर्ज भरला. परंतु इतर सर्वच कुटुंबियांनी त्याला विरोध केला. घरची परिस्थिती अतिशयच वाईट होत होती. आमची ती. आबाआजी मी पाचवीत असतानाच गेली. तिचा आधार आमच्या कुटुंबाला बराच होता. परंतु तीही गेली. हिंदीच्या परीक्षेला मी तालुक्याच्या ठिकाणी जाणार होतो. परंतु माझे जवळ पैसे नाहीत. त्यासाठी आमची एक सगुणाकाकी म्हणून होती. तिने मला एक रुपया दिला आणि मी परीक्षेसाठी गेलो.

ह्याच संदर्भावरून पुढे मराठे प्रतिष्ठानची शिक्षणनिधी योजना कार्यान्वित झाली. तसा मी अभ्यासात हुषार होतो. परंतु घरून काही तीर्थरूपांची थाप माझ्या पाठीवर कधीच पडली नाही. हे माझे दुर्दैवच!

इयत्ता तिसरीत असताना एकदा शिक्षणाधिकारी श्री. भिंगारकर ह्यांनी भाषण कसे करावे ह्याचा श्रीगणेशा दिला आणि त्यानंतर बॅ. नाथ पै ह्यांच्यासारख्या वक्त्यांची भाषणे ऐकायला मिळतील तिथे तिथे मी जाऊन भाषणे ऐकू लागलो. इतर परीक्षा देतच होतो. परंतु घरी शेती करणे व गुळाचा खडा खाऊन, वेळ प्रसंगी कच्चे अन्नही खाऊन, शाळेत जात असे व अभ्यास करत असे. मात्र माझे मन ह्या जगात जगावयास राजी नव्हते. कारण माझे नशीब म्हणा. मी माझे दुःख मधून मधून लिहीत असे. परंतु ती माझी दुःखांची वही मुंबईला जपून ठेवलेली, तीही गहाळ झाली. तेव्हा ती. आईने आपले किडूक मिडूक विकून त्याचे रुपये पंधरा मला दिले व जेमतेम २० ते २५ रुपयांवरच मी मुंबईला आलो.

एलफिन्स्टन रोडला आत्ताच्या मराठे उद्योग भवनच्या पाठीमागेच माझे बस्तान बसविले. तिसऱ्या दिवशी दादरला स्टेशनरी दुकानात नोकरी सुरू केली आणि विसावा हॉटेलमध्ये २ रु. ५० पैशाची राईस प्लेट स्वतःच्या कष्टाची जेवलो. त्यानंतर १५-२० दिवसांनी दुसऱ्या नोकऱ्यांसाठी धडपडतच होतो. शिवाय मला पुन्हा परीक्षा द्यावयाची होतीच. त्याकरिता फी भरणे आलेच. ती फी सुद्धा माझ्याच एका वर्गमित्राने भरली. मग अभ्यास हे सर्व त्रांगडे आलेच. काही दिवसांनी डॉ. मित्र वडिलांच्या ओळखीचे भेटले व त्यांनी मला एक पत्र दिले. ते पत्र घेऊन मी कै. सुरेशभाऊंच्या घरी गेलो. तिथेच कै. आबासाहेब मराठे भेटले. त्यांनी तर मला अर्धा कप चहाही दिला. तीच खरी मराठे प्रतिष्ठानची दीक्षा!

उद्योगभवनात अजून तरी काम सुरू झाले नव्हते. मात्र वांद्र्याला काम आहे का? असे माननीय कै. सुरेशमामांना विचारले व दोनतीन दिवसांत मी वांद्र्याला फायलिंग,

कास्टिंग व १००/१५ नंबरच्या प्रेसवर पत्रा तोडण्याचे काम करू लागलो. चार आण्याचा कांदापाव हे माझे दुपारचे जेवण असे. असे बरेच दिवस गेले. पण तरीही मुख्य म्हणजे मी त्यावेळी बोरीवलीला रहात होतो. पण मी दूध सेंटरमध्ये कामही करीत असल्याने रात्री सेंटरमध्येच झोपत असे व सकाळी नॅशनल पार्कच्या विहीरीवर, म्हणजे आताच्या हाय-वे वर आंघोळ करून लगेच कै. सुरेशभाऊंच्या कंपनीत जात असे. अजूनही ती विहीर मला आठवते. असेच काही दिवस गेल्यावर कंपनीत पॅटर्न बनवायचा असल्याने मी लाकडाच्या वखारीतून एक ओबडधोबड ओंडका आणला व त्याचा दिवसभरात एक विशिष्ट मापाचा तुकडा बनविला. अब्दुलचाचा नेहमी म्हणायचा काय पोरा, दुसरीकडे बघ, इकडे काय मिळणार ? हा विचार डोक्यात येतो न येतो तोच लगेच दुसऱ्या दिवशी चायना वॉर असल्याने गेट वे इथे सैन्यात भरती होण्यासाठी गेलो. पण काय? वजन कमी असल्याने मला परत कामावर यावे लागले. परंतु माझे मन स्वस्थ बसू देत नव्हते. लोक सांगत असत की इथे रोज दोन ते तीन रुपये मिळतो. तिथे जा, इथे जा. पण ही नोकरी सोडू नये असे वाटत असे. कारण इथे तर सवा तीन रुपये होते. शिवाय आपुलकी होती. परंतु एक दिवस मी कै. सुरेशभाऊंकडची नोकरी सोडून दिली. काम केल्याचा पगार व सर्टिफिकेट घेऊन घरी न येता सरळच दादर चौपाटीवर गेलो. तिथे फेसाळणारा समुद्र व आकाशातील चंद्र आणि तारे ह्यांचेपाशी विचार विनिमय करून घरी आलो.

दुसऱ्या दिवशी जिथे गाडी नेईल तिकडे जायचे आणि दिसेल त्या कंपनीत, फॅक्टरीत वॉचमनने दार उघडले की आत शिरायचे. शिरल्यावर मला नोकरी मिळतच असे. रोज किती ? हा मुद्दा नव्हताच. ह्यात सिंधी, पंजाबी, ख्रिस्ती, वेळप्रसंगी मुसलमानही लोक भेटले. मात्र प्रत्येक वेळी नोकरी सोडायची त्या दिवशी समुद्रभेट व नोकरी मिळाल्यावरही समुद्रभेट ही अवश्य असायचीच.

नोकऱ्यांचे स्वरूप असे –मिलमध्ये कांजीवर, घडीखाते, हात सोलून जात, कंगवे बनविण्याचे कामही, प्लॅस्टिकचे केले. डिलिव्हरी बॉयपासून ते काऊंटर व लायब्ररी, दूध सेंटर, हॉटेल वेटर वगैरे करता करता फरशी धुणेसुद्धा. लोकांची ओळख, अनुभव, जगणे म्हणजे काय ? हे मला जवळून पाहायला मिळाले. ह्यावरच मनामध्ये प्रतिष्ठान निर्माण होऊ लागले.

एकदा ऑपेरा हाऊसला मला नोकरी मिळाली व फोर्टमध्ये जाण्याचे वरचे ५ पैसे मिळत. त्यातून तीन पैशांचे कटिंग चहा शंकर विलासमध्ये घेऊन सरळ चालतच जात असे व याचप्रमाणे स्टेशनवरही २ पैशांना कटिंग चहा मिळत असे. एकदा माटुंगा स्टेशनवर माझे पासासहित पाकीट मारले. तो दिवस लक्ष्मीपूजनाचा होता व माझा आतेभाऊ वासू आपटे वांद्रयाला रहात असे. तेव्हा त्याने मला ५ रुपये दिले-लक्ष्मीपूजन असूनही. त्याची मला बहुमोल मदत झाली. त्यानेही माधुकरी मागूनच शिक्षण घेतले होते.

एकदा एक मद्रासी म्हणाला, वामन तू किधर भी जाएगा तो तकलीफ होनेवालाही है. अशा तऱ्हेने दिवस जात होते. घरून पत्रे येत होती. बैल मेला व वासा मोडला. प्रपंच कसा चालवायचा वगैरे वगैरे.

-०-



कृतज्ञ मी !

कृतार्थ मी !!

'वा.ग.' मराठे

२००७

श्री.वा.ग.मराठे यांच्या आगामी आत्मचरित्राचे मुखपृष्ठ

हितगुजच्या वाढीव खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी जाहिराती, हितगुज निधी, वर्गणीदार, या दिशेने आपली वाटचालअसतेच. याशिवाय पृष्ठदान, व सदरदान ( एखाद्या सदराचे प्रायोजिकत्व) हे नवीन मार्ग खुले करीत आहोत.) प्रायोजकाचे नाव त्या सदराखाली अथवा पृष्ठाच्या तळाशी नोंदविले जाईल मूल्य सरसकट रु. ३०० एका वेळच्या नोंदीसाठी. जाहिरातीचे दर पूर्णपान १०००, अर्धे ६०० व किमान ३०० असे निश्चित केले आहेत. - सहसंपादक)

## गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी सूचना

मराठे परिवारातील गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना आपापल्या गुणपत्रिका व फोटोसह पारितोषिकासाठी १५-८-२००७ पर्यंत अर्ज करण्यासाठी जून २००७ च्या हितगुजमध्ये आवाहन केले होते. त्यानुसार आमचेकडे खालीलप्रमाणे अर्ज आले आहेत. या योजनेचा लाभ परिवारातील ज्यास्तीत ज्यास्त गुणवान विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी ही मुदत ३०-९-२००७ पर्यत वाढविण्यात आली आहे. ईमेलवरुनही अर्ज स्वीकारले जातील. मात्र गुणपत्रिकेची प्रमाणित प्रत स्वतंत्रपणे पाठविणे आवश्यक आहे. खालील अर्जदारांपैकी ज्यांनी प्रमाणित गुणपत्रिका व फोटो पाठविले नसतील त्यांनी ते अवश्य पाठवावे. सर्व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांनी १३ ऑक्टोबर २००७ रोजीच्या पारितोषिक वितरणासाठी उपस्थित राहावे.

**मराठे प्रतिष्ठान गुणवत्ता पारितोषिके २००६-०७**

| क्र. | नांव | कुवृपृ. | निवास | प्रतिशत |
|---|---|---|---|---|
| **अ. माध्यमिक शालान्त परीक्षा (१०वी)** | | | | |
| १. | मानसी माधव मराठे | ३१६ | डोंबिवली | ९४.६१ |
| २. | नंदन अमृत मराठे | ०५४ | वसई | ९४.३१ |
| ३. | अक्षय हेमंत परांजपे | ७३० | विलेपार्ले | ९२.४६ |
| ४. | नीता नंदकिशोर मराठे | ४०७ | बांबरनानोडे | ९२.१५ |
| ५. | संकेत सुधीर खांबेटे | ३७६ | ठाणे | ९१.३८ |
| ६. | चिन्मय सुनील टेंबे | ६८४ | डोंबिवली | ८९.५३ |
| ७. | अजिंक्य अनिल मराठे | १३२ | अलिबाग | ८९.३८ |
| ८. | राधिका महेश मराठे | ५४८ | मुलुंड | ८८.४६ |
| ९. | शुभंकर का. मराठे | ०८२ | नागपूर | ८६.५७ |
| १०. | अजिंक्य श्री.मराठे(CBSE) | ०८२ | भोपाळ | ८३.४० |
| ११. | प्रगत प्रदिप मराठे | ३४२ | गोरेगांव | ८२.१५ |
| १२. | मृणाल मधुसूदन मराठे | ५११ | पुणे | ८०.६१ |
| १३. | केदारनाथ प्रफुल्ल खांबेटे | ६८३ | टिटवाळा | ७६.६१ |
| **ब. उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा(१२वी)** | | | | |
| १४ . | शरयू गिरीश जाखोटिया | १२८ | विलेपार्ले | ८०.०० |
| १५. | केतन सुरेश मराठे | १७४ | ठाणे | ७८.३३ |
| १६. | मधुरा प्रभाकर मराठे | १२० | वडाळा | ७४.१७ |
| १७. | पूर्वा श्रीपाद मराठे | ०८७ | डोंबिवली | ७३.३३ |
| १८. | सुवर्णा गोविंद मराठे | ३१६ | डोंबिवली | ७३.१७ |
| १९. | सोनाली प्रमोद मराठे | ३७६ | ठाणे | ६३.५० |
| **क.प्राथमिक शिष्यवृत्ती परिक्षा** | | | | |
| २०. | सानिका विनोद जोशी | १२८ | विलेपार्ले | ९६.६७ |
| **ड.माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षा** अर्ज आले नाहीत | | | | |
| **ई.पदविका,पदवी,उच्च पदवी इ.** | | | | |
| २१. | **बी कॉम**-दीपाली वि.खांबेटे | ८६५ | डोंबिवली | ७८.७५ |
| २२. | **बीएससी**-अनुप अ. साठे | ६७० | बोरिवली | ७६.१३ |
| २३. | **बीएससी**-अमेय अ. मराठे | १३२ | अलिबाग | ६५.१६ |
| २४. | **बीएससी**-कणाद कुळकर्णी | १२८ | विलेपार्ले | ६०.०० |
| २५. | **बीएमएम**-क्षमा रा. मराठे | ५३५ | मुलुंड | ६९.६७ |
| २६. | **कंपनी सेक्रेटरी**-निशाद जाईल | ७५८ | कुर्ला | ५६.६७ |



# संस्कार की सोहळा ?

मंगला प्र. मराठे, (पृ.३६१) गोरेगांव प.
मुंबई ४०००६२, F : २८७३६१०८

लोकलमधल्या ग्रुपच्या गप्पा चालल्या होत्या. गृपमधल्या एकीच्या मुलाची मंज होती. ती खरेदीच्या कथा सांगत होती.

"हां ! मस्त."

"अग, तू बटूची आई आहेस. तू चांगली उठून दिसायला हवीस."

"सगळ्यांना चांगल्या साड्या देणार आहे. उगीच कुणी काही म्हणायला नको. कुणाचे राग रुसवे नकोत."

अशा वेगवेगळ्या मुद्यांवर गाडी चालली होती. सगळ्यांच्या उत्साही प्रतिक्रिया आणि सल्ले चालू होते. मधेच त्यातली एकजण म्हणाली,

"ए, पण आता खरं म्हणजे मुंजीला काही अर्थच उरलेला नाही. मुलं तर आधीच शाळेत जात असतात."

लगेच उत्तर आलं,

"अगं नाही कसा ? आता पूर्वीइतकं महत्त्व नाही हे खरं. पण संस्कार आहेत ना ! मुलांवर चांगले संस्कार होतात. त्यांच्या कानावरुन मंत्र जातात. इतक्या पिढ्यान् पिढ्या चालत आलय ते. त्याचा काहीतरी उपयोग आहे म्हणूनच ना ?"

प्रत्येक कार्याच्या वेळी थोड्याफार फरकाने असे संवाद कानावर पडतात. सोळा संस्कारांचे महत्त्व आपण मानतो. त्यात बारसे, मुंज, लग्न हे विशेष महत्त्वाचे, कौतुकाचे, सोहळ्याचे संस्कार.

प्रत्यक्ष कार्याचे चित्र बहुतेक वेळा असे असते. सगळ्यांची प्रचंड धावपळ चालू असते. कधीकधी भटजींचीसुद्धा आटपून दुसऱ्या ठिकाणी जायची गडबड असते. ते तोंडातल्या तोंडात काय मंत्र म्हणतात ते आपल्याला कळत नाहीत. जे विधी करायचे ते का करायचे, त्यामागचा अर्थ काय, हे कुणी सांगत नाही. भटजी सांगतात तसे पटापट करून टाकायचे इतकेच होते. अशा घाईगडबडीने संस्कार होतात ? संस्कार ही अशी एकदा करुन टाकायची गोष्ट आहे का ?

मग हा घाट घालून आपण काय साधतो ? कौटुंबिक सोहळा, ऐपतीचे प्रदर्शन, परंपरांचे रक्षण की आपण त्या किती मानतो-पाळतो याचे प्रदर्शन ? हा प्रश्न प्रत्येकाने आपल्या मनाला विचारावयास हवा. अशासाठी की कुठेतरी आपण आपल्या मनाची भलावण करतोय, खोटी समजूत घालतोय.

कौटुंबिक सोहळे,समारंभ, स्नेहसंमेलने, करण्यात गैर काहीच नाही. गैर नाही इतकेच नाही तर ते आवश्यक आहेत. घरातल्या कार्याच्या निमित्ताने माणसे एकत्र येतात. नाती अधिक घट्ट होतात. काही वेळा दुरावलेली नाती पुन्हा सांधली जातात.आपल्या रोजच्या जीवनातील तोचतोचपणा आणि ताण जाऊन वातावरण थोडे हलके होते. थोडक्यात म्हणजे आपली बॅटरी चार्ज होते. अधून मधून अशी बॅटरी चार्ज होणे सगळ्याच दृष्टीने आवश्यक आणि उपयोगी असते.

प्रत्यक्षात मात्र सोहळ्यातला नेमका हाच भाग आपण विसरतो आणि घरात कार्य काढले की खरेदी, हौस असे नांव देऊन डामडौल, मानपान, यांनी स्वतःची दमछाक करून घेतो.

आपण नेहमी अभिमानाने म्हणतो, आपल्या सगळ्या रीती-पद्धतीमागे काही ना काही आशय आहे. आधुनिक विज्ञानाचा आणि मानसशास्त्राचा पाया यात आहे. बऱ्याच बाबतीत ते खरे आहे. मुंजीत काशीला निघालेल्या बटूला त्याचा मामा परत आणतो यातून काय दाखविले आहे ? तर भावाने बहिणीच्या पाठीशी राहिले पाहिजे व सुनेचा भाऊही तिच्या आयुष्यातली महत्त्वाची व्यक्ती आहे हे सासरच्यांनी मानले पाहिजे. लग्नात वराची बहीण वधूवरांची गाठ घालते. याचा अर्थ तिच्याशी असलेल्या नात्याची जवळीक नवीन दांपत्याने लक्षात घ्यावी. त्याचबरोबर ही गांठ सुटणार नाही आणि काचणार नाही याची काही जबाबदारी आपल्यावरही आहे हा संदेश त्या बहिणीला आहे.

प्रत्यक्ष परिस्थिती अशी आहे की कुठल्याही कुटुंब सल्ला केंद्रात येणाऱ्या विसंवादाच्या केसेसमध्ये नणंदेचा त्रास असणाऱ्या केसेसची संख्या खूप मोठी असते. 'नातिचरामि' च्या शपथा घेऊनही व्यसनाच्या आणि विवाहबाह्य संबंधांच्या तक्रारी भरपूर दिसतात.

ही विसंगती दिसते कारण ज्या पद्धतीने आपण संस्कार विधी पार पाडतो त्याने कुठलेही संस्कार रुजू शकत नाहीत. आपण कार्याच्या निमित्ताने संस्कार, परंपरा जपल्याचे समाधानन लोकांचे आदरातिथ्य, समारंभाची हौस, अहेर करण्याचा- रिटर्न करण्याचा व्यवहार आणि कौटुंबिक स्नेहसंमेलन सगळे एकातच उरकून टाकायचा प्रयत्न करतो.

हे सगळे विवेचन अशासाठी केले की काही विधी केले की संस्कार झाले असे म्हणून पालक मोकळे होऊ शकत नाहीत. संस्कार ही गोष्ट इतकी छोटी नाही की एखाद्या असाइनमेंटसारखे वेळ ठरवून थोड्याशा वेळात करता येईल. आपल्या प्रत्येक वागण्या बोलण्यातून, आजूबाजूच्या वातावरणातून प्रत्येक क्षणाला मुलावर संस्कार होत असतात. ते अशा कार्याने किंवा संस्कारवर्गाने करता येत नाहीत. रामरक्षा, अथर्वशीर्ष वगैरे पाठ म्हणता आले म्हणजे संस्कार झाले असे नाही. तो संस्काराचा अगदी छोटासा भाग झाला. संस्कार म्हणजे वर्तन पद्धती, विचार पद्धती. ती सतत दिसते, रुजत असते, विकसित होत असते, प्रगल्भ होत असते. पालक झाल्या क्षणापासूनच आपली ही जबाबदारी सुरू होते आणि ती सतत पेलायची असते. संस्कार न संपणारी अविरत चालू राहाणारी गोष्ट आहे. हा आयुष्यभर चालू राहाणारा सोहळा आहे.

" सामर्थ्य आहे चळवळीचे "

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांची राजनीतीच भारताची सर्वांगीण प्रगती करु शकेल." हिंदुस्थानात हिंदु समाज हाच स्वयंभू राष्ट्र आहे ".हिंदु समाजाच्या हिताचा राज्य कारभार आणि हिंदूंचे सैनिकीकरण हे त्यांचे धोरण कार्यवाहीत आाणण्यासाठी हिंदु महासभेचे भूतपूर्व अध्यक्ष आणि स्वातंत्र्यवीरांचे कृतिशील अनुयायी श्री.विक्रम नारायण सावरकर यांनी सतत संघर्ष केला. सावरकरांची विचार सरणी विजयी करण्यासाठी युवा कृतिशील अनुयायानी आवश्यकते नुसार प्रत्यक्ष चळवळ केली पाहिजे. श्री. विक्रम सावरकरांचे प्रस्तुत चरित्र युवा देशभक्तांस मार्गदर्शक ठरेल. (संदर्भ- "युद्ध आमचे सुरू " पुस्तकाचे कव्हर पृष्ठ )

*(संपादकीय भूमिका पृ. १ रून)*

अशक्यप्रायच वाटते. पण निदान आपल्याला मिळालेला उर्वरित भारत तरी पुन:पुन: खंडित होऊन त्याचे आणखी लचके तोडले जाणार नाहीत याची तरी आपण पुरेशी काळजी घेत आहोत काय? देशामध्ये उत्तर आणि उत्तरपूर्व सीमेवरील पाकिस्तान व बांगलादेशप्रणीत घुसखोरी, उत्तरप्रदेश, बंगाल, बिहार व आसाम या राज्यात व्होटबँकेवर नजर ठेऊन आश्रयासाठी व नोकरी व्यवसायासाठी अल्पसंख्यांक समाजाला मुक्तद्वार देऊन कित्येक (अगदी अलिकडच्या सरकारी घोषणेनुसार १०)जिल्हे मुस्लिम बहुसंख्य बनविण्यास हातभार लावणारे केंद्र व राज्य प्रशासन असल्यावर भारताचे 'पापस्ताना'त रूपांतर होण्यापासून केवळ संघटित व जागरूक आणि स्वदेशप्रेमाने प्रेरित युवाशक्तीच वाचवू शकेल. या निमित्ताने मराठे प्रतिष्ठान आपला खारीचा वाटा म्हणून 'मराठे' युवकांना एकत्रित होण्याचे पुनश्च आवाहन करीत आहे. या बाबतीत स्वा. सावरकरांनी वेळोवेळी केलेल्या सावधगिरीच्या सूचना त्यांचे दृष्टेपण सिद्ध करतात.

आज समाजाचे चित्र काय दिसते? पाश्चात्य संस्कृतीच्या सुखोपभोगाच्या मागे लागून, आपल्या संस्कृतीवर आक्रमण करणाऱ्या दूरदर्शनच्या वाहिन्यांमध्ये समाज वाहून जात आहे. शहरांमध्ये गुन्हेगारी भ्रष्टाचार, लाचलुचपत वाढत आहे. राजकारणी, सरकारी नोकर, शासनातले मंत्री, मनोरंजनात गुंतलेले आहेत. गरिबी दूर होत नाही, शेतकरी आत्महत्या करताना दिसतात. असे दारुण विदारक चित्र असले तरी हे सर्व बदलेल. वाईट परिस्थिति पालटेल. कारण चांगले जीवन जगण्याची बुद्धी देणाऱ्या सुखकर्ता-दु:खहर्त्या श्रीगणेशाचे, गणरायाचे आगमन आता होणार आहे. गणपती ही पृथ्वीतत्त्वाची देवता म्हणून गणपतीला दूर्वा वाहून त्याच्यावर जलाभिषेक करतात व ते पाणी तीर्थ म्हणून घेतले असता या तीर्थामध्ये दूर्वेचे गुण अतिसूक्ष्म प्रमाणात येतात. दूर्वेचा तेवढाच अंश आपल्या शरीरातील पार्थिव घटक व क्रियांचे संतुलन करण्यास पुरेसा असतो हा वैदिक शास्त्रशुद्ध विज्ञाननिष्ठ सिद्धान्त आहे. आपणा सर्वांना भारतीय संस्कृतीनुसार सदाचरण करण्याची बुद्धी लाभो ही मंगलमूर्ती श्रीगेशाच्या चरणी प्रार्थना करूया.

हितगुजचा वाङ्मयीन दर्जा श्रेष्ठतम राखण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी सहसंपादक व मी स्वत: जीव ओतून प्रयत्न करीत आहोत. हितगुज दिवसेंदिवस वाचनीय तसेंच संग्रहणीय होत आहे, अशा आशयाची पत्रे तसेच दूरध्वनी आम्हाला येत असतात. हितगुज मध्ये त्यांची नोंदही घेतली जाते. व्यक्तिश: पत्रे लिहिणे वा दूरध्वनी करणे वेळेअभावी नेहमी शक्य होईलच असे नाही हे आपले सदस्य उदारपणे मान्यही करतात. तरीही तसा प्रयत्न जरूर केला जाईल. असो.

'माहेरच्या अंगणात' सदराखाली भगिनींनी लेखनास प्रवृत्त व्हावे ही त्यांना पुन्हा आग्रहाची विनंती. या अंकात आपल्या कुल भगिनी सौ.वृषाली वामन (पृ. ५०३) यांनी आपल्या वहिनीविषयी आत्मीयतेने लिहून चांगली सुरुवात केली आहे.

हितगुज चे आद्यसंपादक व आता अमेरिका निवासी ज्येष्ठ सदस्य श्री.भाऊसाहेब(वि.गो.) मराठे दूरध्वनीवरून अभिनंदन करून म्हणतात, "हितगुजचा देखणा अंक मिळाला. वाचला, फारच चांगला आहे. उत्तरोत्तर असेच हितगुजचे सुरेख अंक निघावेत." भाऊसाहेबांचे हे आशीर्वाद आणि शुभेच्छा आम्हा संपादकद्वयांना निश्चितच प्रेरक आहेत.

आपण सर्वजण शनिवार दि. १३ ऑक्टोबर २००७ ला ठाणे येथे गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी मोठ्या संख्येने येऊन भेटणार आहोत. तसेच प्रतिष्ठान दैनंदिनीसाठीही नोंदणी करणार आहोत याची आपणाला प्रेमाची आठवण करून हे जरा लांबलेले संपादकीय आवरते घेते.

-o-

## सभासदवृत्त- सहवेदना

१. पुण्याचे सदस्य श्री.गजानन चिंतामण मराठे (पृ.१२९) यांचे चुलते चंद्रकांत बळवंत (वय ७४) यांचे दि.**१६-५-२००७** रोजी पुणे येथे दु:खद निधन झाले. त्यांच्या मागे मोठा भाऊ सुधाकर, पुतणे, पत्नी आशा, मुलगा अजित व विवाहित कन्या अलका जोशी आणि सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

२. इंदूर येथील सदस्य श्री. विष्णू नीळकंठ खांबेटे (पृ. ६७०) यांचे **२६जून २००७** रोजी वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने इंदूर येथे दु:खद निधन झाले. ते सुरुवातीच्या काळात ग्वाल्हेर येथे सरकारी शिक्षक होते. नंतर बरीच वर्षे जबलपूर, इंदूर इ. अनेक ठिकाणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारप्रमुख होते. ते अविवाहित होते. त्यांच्या पश्चात विवाहित पुतणे, विवाहित पुतण्या, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

३. तुळस,(वेंगुर्ले) येथील सदस्य गजानन बल्लाळ मराठे (पृ. ४९६) यांचे वयाच्या ७३ व्या वर्षी नुकतेच (३०-६-२००७ च्या सुमारास) दु:खद निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी शारदा, दोन पुत्र-श्रीनिवास व अवधूत आणि कन्या शिल्पा, सून व नातवंडे असा परिवार आहे.

४. प्रतिष्ठानचे मिरज येथील सदस्य ॲड. सुधीर विष्णू मराठे (पृ ४५३) यांचे एकुलते एक पुत्र **पद्मनाभ** (वय २२) यांचे **दि. ८ जुलै २००७** रोजी मिरज येथे अपघाती दु:खद निधन झाले. ते इंजिनियरिंगच्या शेवटच्या वर्गात शिकत होते. मनमिळाऊ खेळाडू म्हणून ते विद्यार्थी मित्रात प्रिय होते.

५. चेंबूर-मुंबई येथील सदस्य श्री.अजित



प्रभाकर मराठे (पृ.३५९) यांच्या मातोश्री श्रीमती स्वाती प्रभाकर (वय ७१) यांचे **दि. २५ ऑगष्ट २००७ रोजी** प्रदीर्घ आजारानंतर दु:खद निघन झाले. त्यांच्या पश्चात तीन लहान बहिणी व भाऊ तसेच विवेक, किरण व अजित हे पुत्र, सुना, तसेच वरुण, राधिका, विशाखा, संजना व प्रणव ही नातवंडे असा परिवार आहे.

या सर्व मृत व्यक्तींच्या कुटुंबियांच्या दु:खात समस्त मराठे परिवार सहभागी आहे. ईश्वर मृतात्म्यांना सद्गती देवो ही प्रार्थना.

-o-

### हितगुज वितरण

जूनच्या अंकातील आवाहनाला अनुसरून हितगुजच्या वितरणासाठी मुलुंड, सांगली- मिरज आणि वडोदरा या ठिकाणांसाठी स्वयंसेवक पुढे आले आहेत. अन्य ठिकाणांसाठी इच्छुक व्यक्तींनी संपर्क साधावा. - सी गो खांबेटे, सहसंपादक.

# सदस्य-संवाद

(१)

*अभय वसंत मराठे,*
*सी ७/११, ऋषिनगर उज्जैन,४५६०१०*
*दूरध्वनी (०७३४) २५१०७४५*
*०९४२५०१४६१०*

सादर वंदे,

अंक ७० मिळाला.बांधणी चांगली. हितगुज आता प्रगती करित आहे. साईज मोठी झाली आणि पृष्ठेही वाढली आहेत.त्याशिवाय हितगुज आता हायटेक झाला आहे. मनाला फार बरे वाटले. असो.

उजैन मध्ये फक्त आम्हीच मराठे (कपिगोत्री) आहोत. तेव्हा हा हितगुजचा अंक मी माझ्या ड्रॉईंग रूमच्या टेबलावर नेहमी ठेवतो. कारण इतरानीही हा वाचावा व दाद द्यावी हाच हेतू.

मागच्या महिन्यात श्री. सीताराम खांबेटे उज्जैनला आलेले असताना घरी पण आले होते. तेव्हा असे वाटले की जवळचे नातेवाईक आलेले आहेत. खूप साऱ्या त्यांच्या बरोबर गप्पा झाल्या. अनेक गोष्टी कळल्या. मी त्यावेळेस त्याना विचारले की 'मराठे' हे आडनांव कसे पडले? त्यांनाही याबद्दल माहीती नव्हती.

मला आठवतय की आमची आजी व मोठे काका स्व. दत्तात्रेय पुरुषोत्तम लहानपणी आम्हाला सांगायचे की आपले पूर्वज म्हणजे फार मोठे आणि शूर होते. त्यांनीच संभाजी महाराजांची मुज आपल्या घरी लावली. आपल्या पंगतीस जेवावयास बसविले. पूर्वी आपले आडनाव विद्वांस होते. पण नंतर संभाजी राजांना त्यांच्या वडिलांकडे म्हणजे शिवाजी महाराजांकडे पोहोचविले. तेंव्हा शिवाजी महाराजांनी त्यांना 'खरे मराठे' ही पदवी दिली. तेंव्हापासून मराठे हे आडनांव आपल्याला मिळालेले आहे.

खरे म्हणजे मराठे आडनांव लावण्याचे दुसरे कारण असावयास हवे व हा शोध घ्यायचा प्रयत्न करावयास हवा. छ.शिवाजी महाराजांच्या इतिहासात सुद्धा संभाजी राजे यांची मुंज एका ब्राह्मणाने लावली व आपल्या घरी ठेवून घेतले व आपल्या पंगतीस जेवायला बसविले. आगऱ्याहून सुटका झाल्यावर शिवाजी महाराजांना संभाजी राजांची फार जास्त चिंता होती. वय लहान आणि ओळखून येणे फारच सोपे होते. मुघलांची सक्ती अशी की ते कधीही त्याना अटक करू शकले असते. तेंव्हा ब्राह्मणांच्या मुलांमध्ये मिसळून संभाजी राजे राहिले व नंतर त्याना रायगडावर आणण्यात आले.

अधिक शोध घेतल्यावर कदाचित हा संबंधही जोडला जाऊ शकेल आणि आमच्या मोठ्या आजीच्या तोंडून ऐकलेली कथा खरी असू शकेल. (या संदर्भात कोणी नवीन माहिती पाठविल्यास अवश्य प्रसिद्ध केली जाईल.- सहसंपादक) -०-

(२)

*प्रा. राजेंद्र खांबेटे,/ मनोज खांबेटे , इंदूर.*
*फोन(०७३१)२६१५४४१ /२३०८७१२*

स.न.

इंदूरमध्ये आम्ही खांबेटे यांची एकूण ९ कुटुंबे आहोत. पूर्वी आम्ही फक्त लग्नकार्य नाहीतर कुळधर्माचे प्रसंगीच एकत्र येत असू. म्हणून आम्ही सर्वांनी नियमितपणे भेटण्याचे ठरविले व दर महिन्याचा एकेक रविवार आळीपाळीने वाटून घेतला. परीक्षांच्या मोसमातील तीन महिने अभ्यासासाठी सोडून बाकीच्या नऊ महिन्यांचे यजमानपद ९ कुटुंबांकडे क्रमवार वाटले गेले. एखादा पिकनिक स्पॉट, नाहीतर चांगलेसे हॉटेल निवडून हा संपूर्ण रविवार सकाळच्या नाश्त्यापासून तो संध्याकाळच्या चहापर्यंत घराबाहेरच्या वेगळ्या वातावरणात सर्वांनी एकत्रपणे एन्जॉय करायचा. यामध्ये सर्व प्रकारचे खेळ, कलागुणदर्शन, व सांस्कृतिक कार्यक्रम व दिवसअखेर पारितोषिक वितरण असा भरगच्च कार्यक्रम असतो. याचा प्रमुख फायदा म्हणजे लहानांना आपल्या परिवारातील मंडळींची चांगली ओळख होते तर मोठ्याना त्यांच्या दैनंदिन कामाच्या धबडघ्यामधून विरंगुळा मिळतो. भगिनी वर्गाला रांधा वाढाच्या चक्रातून मुक्ती मिळते. सर्वच कुटुंबांची बॅटरी रिचार्ज होऊन नव्या जोमाने आपापल्या घरी परततात.

सहज सुचलेल्या कल्पनेतून सुरू झालेले हे मासिक कौटुंबिक मेळाव्याचे आयोजन गेली तीन वर्षे अखंडपणे चालू आहे. व लहानथोर सर्व मिळून ५० जण यामध्ये सहभागी असतात.या उपक्रमाची स्थानिक वृत्तपत्रांनी सुद्धा विशेष नोंद घेतली व ५०उपस्थित खांबेट्यांच्या छायाचित्रासह वृत्त सुद्धा छापले.

गेल्या वर्षी एकदा सर्व खांबेटे-कन्या भगिनीना ( माहेवाशिणी) परिवारासहित निमंत्रित केले असता एकूण उपस्थिति १००च्यावर गेली होती.

*( इंदूरमध्ये एकूण २५ मराठे कुटुंबे आहेत. त्या सर्वांचे असे संगठन बांधता आले तर 'मराठे तितुके मेळवावे ' या आपल्या ब्रीदवाक्याला पुढे नेणारी कृति ठरेल. खांबेटे मंडळींनी आपल्या अनुभवाची शिदोरी मराठे परिवार एकत्र करण्यासाठीसुद्धा वापरावी.अन्य ठिकाणच्या सदस्यांनी देखील अशाप्रकारवे उपक्रम राबवावे व आम्हाला वृत्त कळवावे- सी. गो. खांबेटे सहसंपादक , हितगुज).*

(३)

*दिनकर मुकुंद मराठे (द्वारा महेंद्र जेधे, हॉ.गुरुकृपा)*
*सिंहगड पायथा, चौंडाई देवी मंदिरामागे,*
*आतकरवाडी, पुणे ४११०४२.*

स.न.

हितगुज मार्च २००७ मधील 'मराठे परिवार कट्टा' ही कल्पना खूप आवडली. माझ्या मनात हा विचार अनेक दिवस चालू होता. व ह्या अंकातील निवेदनामुळे त्याला चालनाच मिळाली. सौ नीलांबरी मराठे ह्यांच्याशी याबाबतीत बोललो पण होतो. पण त्यांच्या म्हणण्याप्रमाणे घर पूर्ण झाल्यावर त्यावर आपण हितगुजमध्ये जाहिरातवजा निवेदन देऊ. असो.

आता माझा मुख्य उद्देश म्हणजे पुण्यापासून २६ किमी असलेल्या निसर्गरम्य व ऐतिहासिक वारसा असलेल्या ठिकाणी -सिंहगडाच्या पायथ्याशी- आम्ही घर बांधले आहे. सध्या पुणेकर व इतरांचे 'सिंहगड' हे प्रदूषणापासून मुक्त व सिंहगड चढणे हाच एक प्रकारचा व्यायाम पण होतो, त्यामुळे दिवसेंदिवस लोकप्रिय ठिकाण होत आहे.

शनि-रवि व गुरुवारी येथे अनेकांची गर्दी असते. रविवारी तर सुमारे २-२।। हजार लोक पहाटे ४ पासून स्वतः गाडीने यायला लागतात. इतर बरेच जण स्वार गेटहून पहिल्या पहाटे ५-१० च्या बसने नंतर शनिवार वाडा-सूर्य हॉस्पिटल येथे इतर दिवशी दर तासाने व फक्त रविवारी दर अर्ध्या तासाने पीएमटी बस सेवेचा उपयोग करून येऊ शकतात. तेव्हा आपण जी मराठे परिवार कट्टा ही कल्पना मांडली आहे त्याप्रमाणे माझ्या वास्तूचा वापर करता येईल. माझे घर जुन्या थााटाचे ५ गुंठे जागेत बांधले आहे- कौलारू आणि टेरेसवजा. तेंव्हा आपण त्याचा जरूर वापर करावा.

मी इतकी वर्षे शनिवारपेठमध्ये रहात होतो. सौ. नीलांबरीताईंच्या ऑफिसजवळ माझे शैक्षणिक साधने व बालवाडी साधनांचे दुकान आहे. माझा मुलगा विवेक ते चालवितो. आपण तिकडे किंवा नीलांबरी ताईंकडेच संपर्क साधण्यासाठी विचारणा करावी. माझा इथला फोन (९३२६९७३७३९) दिला आहे. पण उंच डोंगरांमुळे काही वेळा रेंज मिळत नाही.म्हणून पायथ्यात असलेल्या बस स्टॉपवरील गुरुकृपा हॉटेल-महेंद्र जेधे यांचा फोन देत आहे.

(हॉटेल गुरुकृपा २४३८९२७३ महेंद्र जेधे
/हॉटेल कोंडाणा २४३८९०२९ -)

(४)

*मंगला प्र. मराठे ,*
*५/४३, भाग्यश्री सोसायटी, लो.टिळक नगर,*
*म. गांधी मार्ग, गोरेगांव प. मुंबई ४०००६२*
*F२८७३६१०८. सेल-९८६९६२०९११*
*e-mail: marathes2000@yahoo.com*

### -हेल्पलाईनसाठी-

वरील सौ. मंगला मराठे यांनी कळविले आहे की त्या मराठे परिवाराला खालील बाबतीत मदत करू शकतात.

- कौटुंबिक समस्यांबाबत समुपदेशन.
- जाणीव जागृतीचे (awareness) कार्यक्रम
- विवाहपूर्व मार्गदर्शन- विवाहेच्छू व त्यांच्या पालकांसाठी वैयक्तिक समुपदेशन, गटचर्चा,

कार्यशाळा अशा तिन्ही स्वरूपात.

विशेष सूचनाः कुठल्याही कार्यक्रमासाठी मानधनाची कोणतीही अट नसेल.

**मंगलाताईंचा या क्षेत्रातील अनुभव/लेखन**

- स्वाधार या कुटुंब सल्लाकेंद्रात १९८७पासून स्वयंसेवी समुपदेशक.
- 'चर्चामंडळी' या सामाजिक प्रश्नांचा वेध घेणाऱ्या संवादात्मक उपक्रमाचे आयोजन व लेखन.
- गोरेगांव, विलेपार्ले येथे विवाहपूर्व मार्गदर्शन केंद्रे.
- पुस्तकः लग्न-एक जिग सॉ पझल

पुस्तिकाः १. आपले ज्येष्ठ.

२. प्रौढ कुमारिकांचे जीवन

३. पुरुषांवरही अन्याय होतो का ?

-०-

(५)

*दत्तात्रेय आ. मराठे,*

*ए-७ गरुड सोसायटी, मराठी विद्यालय मार्ग, मुलुंड पूर्व, मुंबई ४०००८१*

*फोन-२५६३५४८७*

स.न.

हितगुज वितरणासाठी

जून २००७ अंकामध्ये आपण आवाहन केले आहे त्या अनुषंगाने मला हे काम (मुलुंड विभागा साठी ) करण्याची इच्छा आहे.

गेले काही वर्षे हितगुज या त्रैमासिकाच्या वितरणाचे काम मी केले आहे.

-०-

**सहसंपादकांचे हितगुज**

प्रिय सदस्य /पत्रलेखक बंधू भगिनीनो,

आपल्या सर्वांच्या या प्रतिक्रिया आम्ही प्रातिनिधिक समजून अनेक अन्य सदस्यसुद्धा आम्हाला मूकपणे प्रोत्साहित करीत आहेत असे मानावयास सुरुवात केली आहे. वास्तविक केवळ खुषीपत्रे नकोत असे आम्ही नम्र आवाहन केले होते. अर्थात सुधारणेला नेहेमीच वाव असतो याची जाणीव सतत तेवत ठेऊन आम्ही हितगुजचे नवे रूप अधिकाधिकांच्या पसंतीला उतरावे यासाठी नेटाने प्रयत्न करीत आहोत, करीत राहाणार आहोत. नवयुवकांना, भगिनीवर्गाला, ज्येष्ठाना व बालवर्गाला सुद्धा हितगुज आपले वाटावयास हवे. एकंदरीत या सर्वांगीण बदलासाठी संवाद कोणत्याही मार्गाने साधणे व प्रत्येक 'मराठे' व्यक्तीचा आमच्याशी थेट संपर्क राहावा या हेतूने हितगुज हे माध्यम बळकट करण्यासाठी पृष्ठ मर्यादा ओलांडण्याचे थोडेसे खर्चिक धाडस आम्ही केले आहे.

या संदर्भात आम्हाला सावधगिरीचा इशारा देणारी एक प्रतिक्रिया आली आहे, ती प्रतिष्ठानचे अगदी सुरुवातीपासूनचे सक्रिय कार्यकर्ते व उच्चविद्या विभूषित (युरेनियमविषयक संशोधक-शास्त्रज्ञ) डॉ. सुरेंद्रनाथ मराठे (पूर्वी घाटकोपरचे व आता पुणेकर झालेले) यांची. अंक वेळेवर न मिळण्याची त्यांची पत्राच्या सुरुवातीलाच केलेली रास्त तक्रार अनेकांचीही असण्याची शक्यता आहे हे मान्य करावयास हवे.

मात्र पुढे त्यानी "हितगुज या मराठे प्रतिष्ठानच्या मुखपत्रा" च्या उद्देशाबद्दल- "प्रतिष्ठानच्या कार्याबाबत सभासदांना माहिती देणे, तसेच सभासद-त्यांचे कुटुंबिय यांनी कळविलेल्या आनंददायी /दुःखद घटना, अडी अडचणी वगैरे परिवारातील सभासदांना सांगणे" ही लक्ष्मणरेषा आखून दिली आहे. त्यानुसार त्यांच्या मते, "जून २००७ चा अंक पाहिला तर जवळजवळ ५० टक्के पाने उद्देशाला धरून व ५० टक्के पाने उद्देशविरहित मजकुराने भरलेली दिसतील."

या "उद्देशविरहित मजकुराच्या गुणवत्तेबद्दल अजिबात आक्षेप नाही" असे नमूद करतानाच ते पुढे सावधगिरीचा इशारा देत म्हणतात, " एकीकडे आपण मुखपत्र छपाई व वितरणाच्या खर्चाबद्दल बोलतो व दुसरीकडे पृष्ठमर्यादेस लगाम घालण्याचा प्रयत्न करीत नाही. पाने वाढली की खर्च ज्यास्त होणारच. पण याव्यतिरिक्त मुखपत्र तयार करून घेणाऱ्यांचाही भरपूर वेळ जात असेल. मुखपत्र तयार करणाऱ्यांची गुणवत्ता वाखाणण्याजोगी आहे. पण खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी त्यांना यातायात पडू नये हा माझ्या लिहिण्यामागचा उद्देश आहे."

पत्राचा उद्देश वरीलप्रमाणे एकदा सुनिश्चित केल्यावर डॉ.साहेब पुढे लिहितात, "मुखपत्राबद्दल मी माझे विचार स्पष्टपणे मांडले आहेत. कदाचित हे विचार बऱ्याच जणांना पटणार नाहीत, किंवा निराशाजनक वाटतील. पण काहीतरी यात तथ्य आहे असे वाटत असल्यास याबाबत चर्चा व्हावी. जमल्यास सभासद-वाचकांची मते अजमावता आली तर उत्तम."

इतक्या आस्थेने व तळमळीने व्यक्त केलेल्या भावना आपण सर्वच मराठे मंडळीनी समजून घेतल्या तर ज्या खर्चाच्या तोंडमिळवणीची चिंता पत्रामध्ये डोकावते आहे ती चुटकीसरशी दूर होईल. एखाद्या द्रव्यसंग्रहकारी -जाहिरात, पृष्ठदान, वाढीव वर्गणी इत्यादीच्या स्वरूपातील आवाहनास मराठे चांगला प्रतिसाद देतील याबद्दल आमच्या मनात तिळमात्र शंका नाही. तथापि यापुढे हितगुजची घोडदौड वाचकसदस्यांच्या सर्वस्पर्शी विषयाना हात घालणारी असावी की तिला डॉक्टरसाहेबांना अभिप्रेत असलेल्या " केवळ मुखपत्र" या संकल्पनेच्या लगामाने आवर घालून गेल्या पाव शतकाच्या मळलेल्या वाटेने जाण्यास भाग पाडावे याविषयी आपली मते निःसंकोचपणे व्यक्त करावीत अशी आग्रहाची विनंती करतो.

पत्राचे अखेरीस डॉ.साहेबानी "प्रतिष्ठानचे कार्य अनेक अडचणी असतानाही नेटाने चालू आहे ही आनंदाची गोष्ट आहे व कार्यकारिणीचे सर्व सभासद व मुखपत्राचे संपादक अभिनंदनास पात्र आहेत " असे प्रशंसोद्गार काढले आहेत त्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.

- सी गो खांबेटे, सहसंपादक, हितगुज.

ता.क.- आता थोडे विलंबाविषयी. छपाईची संपूर्ण व्यवस्था - प्रेस, प्रोसेस, आर्टवर्क, फोटोस्कॅनिंग, डीटीपी, बाईंडिंग, डिसपॅच यामध्ये (ठाणेहून अंधेरी) असा बदल करणे सोयीच्या दृष्टीने व काटकसरीसाठी आवश्यक झाले होते. त्यामध्ये नवनवीन प्रयोग, बरेवाईट अनुभव घेऊन आता आम्ही चौथ्या अंकापर्यंत बऱ्यापैकी स्थिर झालो आहोत. पुढचा पाचवा अंक १ डिसेंबरपूर्वी प्रत्येकाला मिळेल असा प्रयत्न आहे.- सहसंपादक.

-०-

## Received by email

1. I have seen the website and e-news letter HITAGUJ. It is xcellent and informative.I do not have Marathi Font on my Computer so cann't write this mail in marathi.I will send scanned photo of Sau.Pratibha Marathe, my mother, as early as possible.

Milind Marathe, Thane,11/8/07
(milindsmarathe@rediffmail.com)

-0-

2. It will be my pleasure to distribute "Hitguj" in Vadodara city. I am also life member of "Hitguj " No of times I get hitguj after the progrmmes are over. Once I would like to attend sammelan in time.Late Sureshbhauna Badodyat Parshurampant Ganpule dini (15 Jan. every year) Pramukh Pahune mhanun bolavanyat majha pudhakar hota Just for information.

Raghuvir Marathe,Vadodara.29/7/07
(maratheraghuvir@yahoo.co.in.

3. I acknowledge that I received the documents. Sorry for delay in reply..I was on vacation for my Son's Upanayanam (munj)..

When do you want me to collect the information of Marathes in Bangalore. I will be out of India during 2nd week of June, hence this question. Depending upon the time. I will let you know if I can collect information or not. However, I would definitely love to do it.My Postal Address is as follows:

*Vijay Prabhakar Khambete*
*B3, block 1, Rama residency Rama temple road,New Thippasandra, Bangalore - 560075 Karnataka*
*Phone: 080-2527-6284,*
*Mobile: 91-98452-06819*



# प्रकाशझोत (४)

## अभय वसंत मराठे (पृ.२११)

उज्जैनचा एकांडा 'मराठे' शिलेदार- एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व

शब्दांकन- सी.गो.खांबेटे (पृ.६७६)

-०-

'रक्ताचे नाते जोडूया' या डिसेंबर २००५ च्या हितगुज मधील आवाहनाला प्रतिसाद म्हणून लगेचच पुढच्या हितगुज (मार्च २००६) मध्ये रक्तदानासंबंधीच्या विस्तृत माहितीपूर्ण लेखाद्वारे **अभय मराठे** आपल्या परिचयाचे झाले आहेत. दुर्मिळ अशा निगेटिव्ह रक्तदात्यांचा ग्रुप तयार करुन व त्या अनुषंगाने 'उज्जैन निगेटिव्ह क्लब' ची स्थापना करुन नेटाने चार यशस्वी संमेलने भरविणाऱ्या श्री. **अभय मराठे** या उज्जैन येथील एकुलते एक 'मराठे' यांची भेट घेण्याचा योग मला नुकताच एका विवाहानिमित्त उज्जैनला गेलो असता आला. त्यांनी सुरू केलेल्या रक्तदान मोहिमेचे अनुकरण आता इंदौर व अन्य शहरातसुद्धा होऊ लागले आहे. आपल्या हितगुज मधील "फक्त रक्तगट कळवा " या साध्या आवाहनाला सुद्धा नगण्य प्रतिसाद आला, रक्तदान तर दूरच! या पार्श्वभूमीवर आपणा सर्वांनी अंतर्मुख होऊन विचार करणे उचित ठरेल. तूर्त सर्व सभासदांनी आपापल्या कुटुंबियांचे रक्तगट आम्हाला कळविण्याचे आवाहन पुन्हा एकदा करीत आहोत.

एबी-निगेटिव्ह रक्तगट असलेल्या या तरुणाचे सामाजिक -सांस्कृतिक कर्तृत्व केवळ अफाट पॉझिटिव्ह आहे असेच म्हणावे लागेल!

कबड्डी-हॉकीचे कॉलेजचे कप्तान; माधव कॉलेज छात्र परिषदचे स्पीकर; अभाविप चे उज्जैनचे प्रतिनिधी; उज्जैन जनता युवा मोर्चाचे, उज्जैन बजरंगदलचे व सांदिपनी विधी महाविद्यालयाच्या विधी पॅनेलचे पूर्व संयोजक; महाराष्ट्र समाज सुवर्ण महोत्सव समिती व गणेशोत्सव समिती, पर्यावरण समिती, मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह युनियन, या उज्जैनच्या संस्थांचे पूर्व अध्यक्ष; भारत विकास परिषदचे व दीन दयाळ परस्पर सहकारी पतपेढी या संस्थांचे संस्थापक सदस्य; अपंग सेवाश्रम,बृहन्महाराष्ट्र मंडळ, या संस्थांचे आजीव सदस्य; सरस्वति शिशु मंदिर व्यवस्था समितीचे सदस्य; निगेटिव्ह क्लब व मराठी व्यावसायिक मंडळ न्यासाचे अध्यक्ष ही त्यानी भूषविलेल्या पदांची केवळ वानगी आहे.

याशिवाय सिंहस्थ पर्वात ५०० युनिट्सचे रक्त संकलन; स्वैच्छिक रक्तदान शिबिरांचे ७८ वेळा आयोजन; स्वतः ५८ वेळा रक्तदान; अनेक स्वास्थ्य शिबिरे, नेत्ररोग परिक्षण शिबिरे, कॅरियर गायडन्स शिबिरे यांचे आयोजन व "जल ही जीवन है"-जल बचाव मोहिमेचे नेतृत्व हे त्यांचे योगदानसुद्धा कौतुकास्पद आहे.

या कार्याची पावती म्हणून त्याना मिळालेले हे पुरस्कारही तसेच आहेत.

आय एस बी टी आय द्वारा अखिल भारतीय एस पी मंडेलिया अॅवार्ड (जयपूर २००४); अवन्तिका साई सेवा संस्थातर्फे प्रांतीय पुरस्कार; स्टेट बँक ऑफ इंदौर, लायन्स क्लब, आणि रोटरी क्लब यांचेकडून सन्मान त्यानी प्राप्त केले आहेत.

अलिकडे गेली काही वर्षे त्यानी १९९८ मध्ये स्थापन केलेल्या मराठी व्यावसायिक मंडळाच्या माध्यमातून आयोजित केलेल्या मराठी व्यंजन महोत्सव (अर्थात मराठी खाद्यपदार्थ मेळावा) या फूड फेस्टिव्हलचे महत्त्व आगळे वेगळे आहे. वर्तमानयुगात पश्चिमी पदार्थ म्हणजे पिझ्झा, बर्गर, चायनीज फूड यांचे प्रस्थ युवावर्गात व एकंदरच समाजात वाढीला लागले आहे. हळूहळू आपले भारतीय खाद्य पदार्थ लुप्त होण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यातून मराठी पदार्थांना तर महाराष्ट्राबाहेरचे मराठी लोकही विसरून गेले आहेत. त्यामुळे अभयने त्यांच्या मराठी मित्रांबरोबर चर्चा करून या मराठी फूड फेस्टिव्हलची योजना आखली. अनेक नामवंत लोकानी त्याना मूर्खात काढले. पण जिद्द न सोडता शर्मा परिसर या लहान जागेत त्यानी ही जत्रा भरविली. खासदार सुमित्रा महाजन यांच्या हस्ते संध्याकाळी ६ वा. उद्घाटन झाल्यावर ३ तासात स्टॉलवरचे सर्व पदार्थ संपले होते. पुरणपोळी ते कुसकरा व रावणभात पर्यंत एकूण ४० व्यंजनांचे स्टॉल होते. वांग्याचे भरीत व भाकरीचा स्टॉल गाजला. सुमारे अडीच क्विंटल (२५० किलो) वांग्याचे भरित व २ क्विंटल पोळ्यांचा कुसकरा लोकानी आवडीने फस्त केला. दशमी - ठेचाची तर सौ. नाईक बाईना वर्षभर ऑर्डर मिळत राहिली.

२००६च्या उज्जैन जत्रेसाठी दशहरा मैदानाची निवड करावी लागली. त्यात तीन दिवसात ५०००० लोकांनी हजेरी लावली. मराठी भाषी आणि अन्य बोहरा समाज, शीख, मुस्लिम इत्यादींनी विशेष उत्साहाने मराठी पदार्थांचा आस्वाद घेऊन रेसिपीसाठी आस्थेने चौकशी केली. या जत्रेमध्ये मराठी संस्कृतीशी निगडित मराठी सांस्कृतिक कार्यक्रम जोगवा, भारूड, गोंधळ, कीर्तन, पाऊल भजन इत्यादींची जोड देऊन मराठी वातावरण निर्मितीचा प्रयत्न केला. स्व. प्रमोद महाजनांनी तर असा प्रश्न केला की, "अरे बाबानो, तुम्ही मध्यप्रदेशात मराठी खाद्य पदार्थांना पुढे आणता आहात पण महाराष्ट्रात, फार काय, अगदी मुंबई-पुण्यात काय ? हे मराठी व्यंजन उत्सव आता तिकडे घेऊन जायची वेळ आली आहे ! त्यामुळे लुप्त होणाऱ्या मराठी पदार्थांना संजीवनी देण्याचे काम होऊ शकेल."

या जत्रेत समाविष्ट पदार्थांचे स्टॉल्सचे मेनू कार्ड पाहिले तर एवढे मराठी पदार्थ अस्तित्वात आहेत हेच नवलाचे वाटेल!

१. पुरणपोळी (साजुक तुपासहित)
२.गुळाची पोळी (साजुक तुपासहित)
३.मसाले भात , दुधी हलवा
४.रावण भात- केशरी भात
५.साटोरी-फाडे
६.गोळा-कढीभात / खिचडी,नारळाच्या वड्या
७.चकल्या, अनारसे, भाकर वडी
८. उकरपिंडी घारगे (गोड)
९.उकडीचे मोदक. शंकरपाळे गोड/ खारे
१०.शिरा, उपमा, सांजा
११.थालिपीठ- लोणचं चटणी तूप लोणी सहित
१२.भाकरी चटणी पातळ भाजी
१३.मिसळ पाव, दाण्याच्या वड्या
१४.धिरडी, लोणचे, गोड धिरडी
१५.कसकरा गोड, तिखट
१६.वाटली डाळ, करंजी
१७.बासुंदी, जिलबी
१८.भाकरी ठेचा भरीत
१९.बेसन, गाकर

२०.तिळाचे लाडू, वड्या, चिवडा पोह्याचा
**२१.पाटवड्या, खांडवी**
**२२.साबूदाणा खिचडी, वडे**
**२३.कोशिंबीर, रायतं, चटण्या(विविध प्रकार)**
**२४. वऱ्हाडी वडे भात, गुलाबजाम**
**२५.दडपे पोहे, चिरोटे**
**२६.बज्यांचे प्रकार**
**२७. बटाटेवडापा, चटणी**
**२८. मुगाचे, मेथीचे, डिंकाचे लाडू**
**२९.बेसन, रवामावा,वाटल्या डाळीचे लाडू**
**३०.अप्पे, गुळपापडी वड्या/लाडू**
**३१.बटाटे पोहे**
**३२.उपजे, तळलेले मोदक**
**३३.सोलकढी भात, गोड भजी**
**३४.चहा कॉफी**
**३५.दही वडे, गाजर हलवा**
**३६.श्रीखंड,पुऱ्या,उकडलेल्या बटाट्याची भाजी**
**३७.दशमी , ठेचा**
**३८.मसाला पान**
**३९.फ्रूटचाट**
**कमर्शियल स्टॉल**
**४०. लोणच्यांचे प्रकार**
**४१.कोरडी भाजणी(उपासाची/ साधी)**
**४२.पापड, कुरडया, कोरडे मूगवडे**
**४३.आईस्क्रिम**

हे सर्व विस्ताराने लिहिण्याचे कारण की अशा प्रकारचे आयोजन एखाद्या मराठे परिवार सदस्याला आपल्या विभागात करायचे झाले तर लागणारे मार्गदर्शन आपण अभय मराठेंकडून हक्काने मिळवू शकाल.

-०-

*(सभासदवृत्त-मानसन्मान पृ.३ वरून)*

सहलीत भाग घेऊन फ्रान्स, बेल्जियम, इटली, ऑस्ट्रिया, नेदरलँड्स, जर्मनी या देशांचा यशस्वी व अनुभवसंपन्न अभ्यासदौरा केला.

-०-



**५. ज्येष्ठ क्रीडापटू श्री.द.आ.मराठे यांना आगळा बहुमान**

ए-७,गरुड सोसायटी
मुलुंड-पू.मुंबई ४०००८१
F २५६३५४८७.

मुलुंडचे दत्तात्रेय आ. मराठे (पृ.३२६) हे वयोज्येष्ठ जलतरणपटू (८३ नाबाद) गेली १७ वर्षे मुलुंडच्या प्रियदर्शिनी तरण तलावाचे सदस्य असून त्यानी आजवर अनेक मुलाना पोहोण्यास शिकविले आहे. "Greater Mumbai Aquatic Association" तर्फे आयोजित विविध वयोगटातील मुलामुलींसाठी स्पर्धा भरविली जाते. या संस्थेच्या खास निमंत्रणावरून या वर्षीच्या स्पर्धेच्या उद्घाटनाचा बहुमान श्री. द.आ. याना देण्यात आला. त्यांनी नागपूरच्या १९९७ च्या राज्यस्तरीय ज्येष्ठ नागरिक जलतरण स्पर्धेमध्ये रौप्यपदक मिळविले होते. त्यांचा आजही विविध प्रकारच्या क्रीडा प्रकारांशी संबंध असून प्रतिष्ठानने त्यांच्या या कार्याची वेळोवेळी समयोचित दखल घेतली आहे. त्यांच्या या क्रीडानैपुण्याचा युवा पिढीने आदर्श ठेवणे उचित ठरेल.

## नांदा सौख्यभरे

१. होडावडे (वेंगुर्ले) येथील श्रीमती सुलेखा व कै.श्रीपाद महादेव मराठे (पृ.४९५) यांची कन्या **कु.दीपा** हिचा शुभविवाह मिरज येथील श्री. गणेश ताम्हनकर यांचा पुत्र **चि. चिंतामणी** यांचे बरोबर **दि.८ जुलै २००७** रोजी श्री.बाळ मराठे, होडावडे यांचे निवासस्थानी संपन्न झाला.

२. मूळचे वेंगुर्ले येथील व आता ठाकुर्ली निवासी श्री.श्रीनिवास रघुनाथ (पृ.३९७) यांची कन्या **कु.वृषाली** हिचा शुभविवाह डोंबिवली येथील श्री. विनायक ब.देवस्थळी यांचा पुत्र **चि. पद्मनाभ** यांचेबरोबर **दि.२३जून २००७** रोजी सुयोग कार्यालय, डोंबिवली येथे संपन्न झाला.

-०-

३. भटवाडी,वेंगुर्ले येथील श्री.मदन (मधू) रामचंद्र मराठे (पृ. ४०७) यांचा पुत्र **चि. निलेश** याचा शुभविवाह श्री कृष्णा तेंडुलकर, नाशिक, यांची कन्या चि. प्रांजली हिचे बरोबर २९ एप्रिल २००७रोजी भटवाडी येथे संपन्न झाला.

-०-

## अपत्यप्राप्ती

श्री.अखिल जयंत विद्वांस (पृ. ६२४) यांस फ्रेमाँट, कॅलिफोर्निया येथे दि.३० ऑगस्ट २००७ रोजी पुत्रप्राप्ती झाली. मुलाचे नांव सनत ठेवण्यात आले असून बाळ बाळंतीण खुशाल आहेत.अखिल विद्वांस हे प्रतिष्ठानचे आक्षयदाता सदस्य झाले असून ते प्रतिष्ठानचे कार्योपाध्यक्ष श्री. रमाकांत माधव विद्वांस यांचे पुतणे आहेत. प्रतिष्ठानतर्फे निखिल यांस शुभेच्छा.

-०-

## स्मरणार्थ / पूर्वसूचना

१. गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ **शनिवार दि.१३ऑक्टोबर ०७ रोजी सायं. ५वा.** नातूबाग, स्टेशनजवळ, नौपाडा, ठाणे(प.)येथे **सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. ना.ज. जाईल** यांचे हस्ते आयोजित केला आहे. याच वेळी सुप्रसिद्ध निवेदक **श्री.भाऊ मराठे** यांचा **"भाऊचा धक्का"** हा रंजक कार्यक्रमसुद्धा होणार आहे.

२. जून २००७ च्या हितगुज मध्ये पृ.१८ वर जाहीर केल्याप्रमाणे गुणवत्ता पारितोषिकांसाठी अर्ज पाठवावयाची मुदत १५ ऑगष्ट २००७ ला संपते. आता सुधारित मुदत **३० सप्टेंबर २००७** असून त्यापूर्वी पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज पाठवून या योजनेचा लाभ घ्यावा. गुणपत्रिकेबरोबर फोटो पाठवायला विसरू नये. ई-मेलवर पाठविण्याचा पर्याय खुला आहे. (आमचेकडे २५ ऑगस्ट ०७ पर्यत आलेल्या अर्जांची सूची पृ.१७ वर पहा. यामध्ये त्रुटी आढळल्यास हितगुजशी त्वरित संपर्क साधावा.)

३. **मराठे प्रतिष्ठान दैनंदिनी २००८चा प्रकाशन समारंभ** व प्रतिष्ठानचा २८वा वर्धापनदिन गतवर्षाप्रमाणे यावर्षीही **दि.२५ डिसेंबर २००७** रोजी गांधर्व महाविद्यालय सभागृह, ४१५ शनिवार पेठ, मेहूणपुरा, जोशी बंधू मंगल कार्यालयाजवळ, वर्तक आश्रमाशेजारी, पुणे ३० येथे सायं. ४ ते ८.आयोजिला आहे. खास आकर्षण-**१)श्री. भाऊ मराठे यांचा 'भाऊचा धक्का',२) श्री.गिरीश जाखोटिया यांचे 'मारवाडी किस्से' आणि ३)श्री.ह.मो. मराठे यांचे 'मुक्त विचारमंथन'.** आपल्या डायरीच्या प्रतीसाठी व डायरीत देण्याच्या जाहिराती, मजकुरासाठी त्वरित संपर्क साधावा.( अधिक माहिती पृ.११ पहा)

४. **जागतिक चित्पावन महासंमेलन: २३ डिसेंबर२००७** ची सूचना व कार्यक्रमाचा तपशील जून २००७च्या हितगुज मध्ये दिला आहे. त्यानुसार नोंदणीसाठी संपर्क साधावा. (हितगुज जून पृ. ७ पहा)

५. **कै.चिंतामण बळवंत मराठे स्मृती निबंध स्पर्धा-२००८** विविध वयोगटांसाठी आयोजिली आहे. निबंध पाठविण्याची अंतिम तारीख **२९-१-२००८.** ( स्पर्धेचा तपशील याच अंकात पृ.१४ वर पहा.)

६. इंटरनेट संपर्क उपलब्ध असणाऱ्या सदस्य वाचकांसाठी **दि.१ ऑक्टोबर २००७ पासून हितगुज मासिक वेब पत्रिका** हा नवीन पूरक उपक्रम सुरू करीत आहोत. आपल्या प्रतिसादाची, किमान ई-मेलवर पोच-पावतीची अपेक्षा आहे.(या विषयीची सूचना पृ. ११ वर पहा)

-०-

महाराष्ट्रीय लोकांमध्ये आणि विशेषत:
समस्त मराठे कुटुंबियांमध्ये बांधकाम क्षेत्रामधील
एकमेव विश्वसनीय नाव

# निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज्

## संचालक - श्री. अजित श्रीराम मराठे



## नेरळ स्टेशनपासून फक्त १ कि.मी. अंतरावर,

## उल्हास नदीकिनारी वसलेली बंगलो स्कीम

**आमचे अन्य प्रोजेक्टस्**

- निर्माण माथेरान व्हॅली नेरळ - बंगलो स्कीम
- निर्माण नगरी नेरळ - मिनी टाऊनशिप
- ऋतुनिर्माण नेरळ - बंगलो स्कीम
- खंडाळा - निर्माण हायलॅन्ड बंगलो स्कीम
- मधुसुमित्रा निर्माण - गोरेगांव-माणगांव (मुंबई-गोवा महामार्ग) - अपार्टमेंटस् स्कीम
- निर्माण लेक व्ह्यू - गोरेगांव-माणगांव (मुंबई-गोवा महामार्ग) - अपार्टमेंटस् स्कीम

**आमचे मुंबईतील प्रोजेक्टस्**

- महालक्ष्मी
- जोगेश्वरी,
- गोरेगाव,
- मालाड,
- कांदिवली,
- विलेपार्ले (पूर्व) आणि विलेपार्ले (पश्चिम) स्टेशन समोर

NIRMAN
GROUP OF COMPANIES
ISO 9001:2000 Certified
• Builders • Developers • Consultants

हेड ऑफिस : 14, न्यायसागर अपार्टमेंट, नागरदास रोड, चिनॉय कॉलेज जवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई - 69.
संपर्क : 2683 3131 (6 Lines) साईट ऑफिस : नेरळ (सेंट्रल रेल्वे मुंबई-कर्जत मेन लाईन),
दूरध्वनी - 02148-238251 / 02148-236696

BOOK POST

If udelevered, please return to

सहायक संपादक,
हितगुज
श्री.सीताराम गो.खांबेटे
ए-१३,संपदा सोसायटी
स्वामी नित्यानंद मार्ग,
अंधेरी-पूर्व, मुंबई
४०००६९

**त्रैमासिक हितगुज** हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
**पत्रव्यवहाराचा पत्ता:** सहायक संपादक:श्री.सीताराम गो.खांबेटे,ए-१३, संपदा सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी-पूर्व, मुंबई ४०००६९; दूरध्वनी: २६८३६९९४;
मोबाईल : ९८३३५६४२६८.**ईमेल** (1) sitaram_khambete@yahoo.com (2) maratheparivar@yahoo.co.in **वेबसाईट :** www.marathepratishthan.org